नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जून १९६०

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

या अंकातील लेखक व कवि

- बाबा मोहोड
- वसंत वि. साखरकर
- तु. ना. काटकर
- दत्तु गोरे
- मनोहर वझे
- ब. स. येरकुंटवार
- दि. वा. देशपांडे
- पु. य. देशपांडे

मूल्य ५० नये पैसे

युगवाणी

संपादक: पु. ग. देशपांडे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(मध्यप्रदेश शिक्षणविभागाकडून वाचनालयाकरिता मान्य झालें)

युगवाणी

संपादक–मंडळ
संपादक पु. य. देशपांडे
सदस्य प्र. वा. ऊर्ध्वरे
पुरुषोत्तम दिवाकर

जून १९६०

कविता

माझी वेदनाही आता— बाबा मोहोड
शांतीदूत— वसंत वि. साखरकर
माया–ब्रह्म भाकरीत— तु. ना. काटकर
प्रीत राहू दे— दत्तु गोरे
आशामर्म— मनोहर वझे

लेख

संत–सत्पुरुष त्रिकालदर्शी असतात का ?
डॉ. देशपांडयांचा 'क्षोभ'— व. स. येरकुंटवार

समीक्षा

ललितकलेचे काही प्रश्न— पु. य. देशपांडे

कथा

माणूस— दिनकर वामनराव देशपांडे

★ ★ ★

संघवार्ता—परीक्षा समिति वृत्त

★ ★ ★

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गेल्या आणि 'स्थाणुनिखतन' न्यायाने जुन्या नियमाचे, अंतर्गत विसंगतीने भरलेल्या नियमांचे खुंटे बळकट करण्यात आले. त्यावेळी प्रा. जोगाची बाजू कोणती होती याचा त्यांनी विचार करावा आणि मगच १९३० चे नियम स्थूणानिखतन-न्यायाने 'विद्वानांनी' संमत केल्याबद्दल समाधान प्रकट करावे !

ही वस्तुस्थिति मुंबई सरकारच्या शिक्षणाधिकाऱ्यांना माहीत होती की नाही हे सांगता येत नाही. तथापि हे नियम आता '**सर्व संमत**' झाले आहेत. असा समज परिषदेच्या चालकांनी करून दिलेला आहे आणि त्याचा ते तसाच प्रचार करीत आहेत. परिषदेच्या मुखरांचे हे आडमुठे धोरण पाहून, शेवटी वि. सा. संघाने आपले नियम (आणि हेच नियम, शेवटच्या सभेपूर्वी म. सा. प च्या शुद्धलेखन मंडळाने मान्य केले होते !) अमलात आणण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे वि. सा. संघाकडून घेतल्या जाणाऱ्या परिक्षांत ते सुरू करण्यांत आले. वि. सा. संघाची प्रकाशने त्याप्रमाणे निघू लागली. या नियमांना नागपूर विद्यापीठाच्या मराठी अभ्यासक्रम मंडळाने, फॅकल्टी ऑफ आर्टस्‌ने, ॲकेडेमिक कौन्सिलने व एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलने मान्यता दिली आहे आणि नागपूर विद्यापीठातील मराठीच्या सर्व परीक्षात ते सुरू करण्यात आले आहेत. नागपूर विद्यापीठातील कांही विभागात (Faculties) 'मराठी' माध्यम असल्यामुळे या नियमांचा वापर तेथेहि आवश्यकतेने होईल यांत संदेह नाही. महाराष्ट्राच्या शिक्षण खात्याने या गोष्टीकडे लक्ष द्यावे अशी आमची त्यांना विनंती आहे. महाराष्ट्र राज्याचा कारभार मराठी भाषेतून चालविताना वि. सा. संघाचेच नियम सर्वांना सुलभ वाटतील याविषयी आम्हाला खात्री आहे. ज्या पुण्यातील सा. परिषदेने १९३० साली शुद्धलेखनाचे नवीन नियम केले होते त्या पुण्याच्या विद्यापीठाने त्यांना आता म्हणजे यावर्षी मान्यता दिली आहे. मुंबई विद्यापीठाच्या मुरारीचा तर कालपर्यंत तृतीय पंथ होता. पण त्यानेहि आता हातास हात लावला आहे. याचा अर्थ हा की १९३० मधे प्रगतिसाठी तयार केलेल्या या नियमांची प्रगतिपरता आता ३० वर्षांनी त्यांच्या प्रत्ययाला आली. आम्हाला खात्री आहे की आणखी ३० वर्षांनी वि. सा. संघाने केलेल्या नियमातील सुसंगतपणा हि पटल्यावाचून राहणार नाही. तोपर्यंत त्यांची इच्छा असेल तर पुराणप्रियतेच्या जाळ्यांत या विद्वानांना शिक्षणखात्याने खुशाल राहू द्यावे. पण त्यातून बाहेर पडून प्रगतीची पावले वजेने पण निश्चयाने टाकणाऱ्या विदर्भवासियांना, एकीकरणाच्या नांवाखाली पुन्हा या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करू नये !

पु. य. देशपांडे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क वि ता

माझी वेदनाही आता

बाबा मोहोड

तीन दिवसच होता
दारी तेरड्याचा रंग
मोल होते दु:खालाही
अपेक्षेचा होता संग
निळया गगनाला होत्या
तडा अक्षय अनेक
वाटा भोवताली लाख
वाटसरू होता एक
आतां सारेंच सरलें
वाट एकटी उरली
माझी वेदनाही आता
मुक्त हसाया लागली

मस्त तांबडा कण्हेर
होता शेजारी फुलला
तप्त वैशाखांत होती
धुंद आषाढाची त्याला
खिडकीशी कधीकाळी
होता बोलत कांहीसें
त्याचें तेवढेंही होतें
पुरें लावयाला पिसें
सुरवंटाची तिथेही
फुलपांखरें जाहलीं
माझी वेदनाही आतां
मुक्त हसाया लागली

आता एकच राहिला
पुढें अथांग सागर
पैल तीरावर त्याच्या
निळें निळे तुझें घर
वेड तेथलें जीवाला
उभें कापाया अंतर
अंत आहे वादळाला
सागराला पैलतीर
रात अंधारी केव्हांच
वस्त्र प्रकाशाचें ल्याली
माझी वेदनाही आता
मुक्त हसाया लागली

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शांतीदूत ! —वसंत वि. साखरकर.

माझ्या यशाचं चांदणं
तूंच उद्या पाहशील
काळजास भिनवून
आनंदाश्रू थिबकेल !

" अभिनंदन " करता
उसळेल हास्य गालीं
क्षण क्षण हसेल ग
सूर्य फूल–रूप भाळीं !!

झंकारेल हृद्‌वीणा
तुझे आभार मानता
डाव। डोळा फडफडे
उंचावशील का माथा ?

साहित्याच्या सीमेवर
हित गूज पाहशील
मेघदूत–मनुजास
" खटयाळ " ना, वदशील !

निरांजनीं दीप ज्योत
लावतांच ध्यान त्यांत
जन सागरांत नाव
होडी दोन शांत शांत !!

★ ★ ★

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माया-ब्रह्म भाकरींत !

तु. ना. काटकर
चांदा

चन्द्रमोळी झोंपडींत
कोण विवस्त्र माउली ?
लज्जा रक्षणास चिंधी
साधन देई सावली !

भर माध्यान्ही दुपारी
पडे बाहेर लेकरू
नदी किनारी पाण्याला
जन्मल्यागत कोंकरू !

चैतन्यमय सांगाडा
जिवंत नर–कंकाल
ती तया विवस्त्रा आई
अन् तो तिचा नग्न बाळ !

तप्त वाळुवरी पाय
जणु फुटाणे फुटती
पोर दुडदुड धावे
डोई घागर गळती !

आई पुढे करी कोर
सुका तुकडा भाकरी
चट् झडप घाली पोर
भुकेल्या लांडग्या परी !

संपता कोर भाकर
खापरावर धावला
झिटकारिलें तत्काळ
" मला नको का पोटाला ? "

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माय–लेकरांचें द्वंद्व
धरी तदा उग्र रूप
आईच्या उपटी झिंज्या
आई ओरवाडी खूप

माय–लेकरांवात्सल्य
कवि वर्णिती सकल !
बघता ऐसे प्रत्यक्ष
उड्या डोहांत घेतील !!

कैसा भाकरीचा प्रश्न ?
भेडसावी दिनरात
मातेला न पुत्र–पर्वा
माया–ब्रह्म भाकरींत !!

★ ★ ★

–प्रीत राहूं दे–

दत्तु गौर

तुझ्या स्मृतीची स्मरणी
नित्य बसावें ओढीत
आणि त्यांतून पहावें
तुझें रूप एकचित्त !

तुझ्या स्मृतींच्या स्मरणीं
धन्य सौख्य तें जीवन
स्मरणी ओढीत बैसता,
सदा गावें तुझें ध्यान !

स्मरणीच्या सर्व मण्या–
अपुली गे ज्ञात संग.
तुझी माझी एक सखे,
प्रीत राहूं दें अभंग !

★ ★ ★

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी जून १९६०

आशा मर्म

मनोहर वझे

अज्ञेयाच्या छायेत केलेली भ्रमन्ती
हें जीवन
हा ध्यास, हे भास, संगमरवरी स्वप्नें
हेंच धन
रुधिराची साक्ष, वासनेचा दक्ष
ह्याचें जळजळतें दुःख
क्षितिज दिसत नाही, पण वाट सुटत नाही
हेच आशा मर्म

* * *

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संत-सत्पुरुष त्रिकालदर्शी असतात कां ?

[संत-सत्पुरुष हे त्रिकालदर्शी असतात, असा समज योग-भक्तिसंप्रदायात रूढ आहे. तथाकथित बुद्धिवादी आधुनिक हे, हा समज म्हणजे एक भाकडकथा आहे, असे मानतात. कारण निर्विवाद असा पुरावा उपलब्ध झाल्याशिवाय त्यांना कोणत्याहि गोष्टीवर विश्वास ठेवावासा वाटत नाही. आणि यांत काही वावगें आहे, असें म्हणता येत नाही.

असा एक पुरावा येथे सादर करण्यात येत आहे. 'श्री ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज यांचें चरित्र आणि वाङ्मय' या नावाचा एक ७६६ पानाचा ग्रंथ प्रा. केशव विष्णु बेलसरे, एम्. ए., सिद्धार्थ कॉलेज, मुंबई, यांनी लिहिला आहे आणि तो श्री. य. गो. जोशी, 'प्रसाद प्रकाशन' पुणें, यांनी प्रकाशित केला आहे.

श्री गोंदवलेकर महाराज या नावाचे एक संत-सत्पुरुष महाराष्ट्रांत आधुनिक काळातच होऊन गेले. सन १९१३ साली गोंदवल्यासच त्यांनी देह ठेवला. "महाराष्ट्र, कर्नाटक, म्हैसुर, मराठवाडा, इंदूर वगैरे ठिकाणी श्रीमहाराजांची मंडळी पसरलेली आहेत." या मंडळीपैकी अनेक चांगले सुशिक्षित व सुविद्य असे होते; अद्यापहि थोडेबहुत उरले आहेत. प्रा. बेलसरे यांनी हा ग्रंथ परिश्रमपूर्वक, यथार्थ माहिती गोळा करून लिहिला आहे. भाकडकथांना त्यात स्थान त्यांनी दिले नाही, असा त्यांचा दावा आहे.

याच ग्रंथातील एक उतारा (पान ३५९-६१) खाली उद्धृत करण्यात येत आहे. ही एक विलक्षण व अद्भुत भविष्यवाणी आहे. सन १९१३ साली श्री गोंदवलेकर महाराजाच्या मुखातून जे उद्गार बाहेर पडले ते जसेच्या तसे या त्यांच्या चरित्र-ग्रंथात, विश्वसनीय पुराव्याच्या आधारावर, नमूद करण्यात आले आहेत. ही भविष्यवाणी किती यथार्थ ठरली आहे, हे खाली दिलेला मजकूर वाचताच वाचकांच्या ध्यानात येईल आणि त्यापासून ज्याना बोध घ्यावासा वाटेल त्यांना तो घेता येईल. — संपादक]

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अद्भुत भविष्यवाणी

"अलीकडे वर्षभर (१९१३) श्रीमहाराज सारखे लोकांना सांगत, 'सांभाळा रे सांभाळा ! यापुढे दिवस फार वाईट येणार आहेत. कलि फार मातेल. महागाई फार वाढेल. स्वार्थ फार बोभावेल. अनीतीला जोर चढेल. भगवंताचा विसर पडेल आणि रोगराई खूप पसरेल '

"सामान्य लोकांना त्यांच्या बोलण्याचे फारसे महत्त्व वाटत नसे परंतु जे लोक सुशिक्षित होते आणि जे वर्तमानपत्रें वाचीत असत त्यांना त्यांच्या बोलण्याबद्दल कुतूहल वाटे. गोंदवल्यास 'केसरी' नियमाने येत होता. 'केसरी आला म्हणजे .... 'बघरे ! त्यांत काही लढाईची बातमी आहे का ?' किंवा 'जगात कोठे लढाई सुरू झाली का बघ.'

"अनेक वेळा त्यांचे हे बोलणें ऐकून भाऊसाहेब केतकर (एंजीनिअर, गोंदवले) एकदा म्हणाले, महाराज 'आपण लढाईविषयी नेहमी बोलत असता, लढाई खरोखरच सुरू होणार आहे काय ?'– यावर श्रीमहाराजानी जे उत्तर दिले ते फारच मार्मिक असल्याने प्रत्येकाने (विशेषतः सध्याच्या परिस्थितीत) लक्षात ठेवणे जरूर आहे. श्रीमहाराज बोलले,

"भाऊसाहेब पुढे येणारी पन्नास पंचावन वर्षे जगाला फार तापदायक आहेत. जगामध्ये लढाया नेहमीच होत आल्या आहेत. त्यामध्ये मनुष्यहानि व संपत्तीची हानि पुष्कळच झाली; पण यानंतरच्या काळात ज्या लढाया होतील व त्यामध्ये माणसांची व संपत्तीची हानि होईल तिची कल्पना तुम्हा लोकाना देणे आज शक्यच नाही. कौरवांची व पांडवांची भयंकर अस्त्रे होती असे आपण ऐकतो. त्या तोडीची अस्त्रे आता निघतील आणि जगाला जाळून टाकतील. सर्व माणसें अत्यंत स्वार्थी बनतील आणि देहाचे भोग भोगणें व एक दिवस मरून जाणे यात शहाणपणा आहे असे ठरेल. दोन पिढयात आपल्या देशाला स्वराज्य मिळेल, पण त्यानंतर देवाधर्मावर मोठे आघात होऊन भगवंताचें प्रेम टिकविणे कठिण होऊन बसेल. आजपर्यंत कधी झाला नाही इतका पुस्तकी ज्ञानाचा प्रसार होईल. आपल्या गुरूला कळले नाही असे म्हणणारा शिष्यच मोठी मान्यता पावेल ! पैसा हेच जीवित–सर्वस्व बनेल. आचार–धर्म नाश पावेल व खाण्यापिण्यास, लग्न करण्यास, विषयसेवनास काही धरबंध राहणार नाही. इतकेच नव्हे तर जो संयमाने वागेल त्याची निंदा होईल ! जिकडे तिकडे असमाधान बोकावेल व सामान्य माणसाला सुख लागणार नाही. चिंतेचें साम्राज्य पृथ्वीवर पसरेल आणि जीवनांत स्वारस्य न वाटल्यामुळे पुष्कळ लोक आत्महत्या करतील. पुढारीपणाने वागणारीं माणसें आपल्या पायरीवरून भ्रष्ट होतील आणि लोकांना भलत्याच

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मार्गाला लावतील. पुरुषाचे जाऊंच द्या; पण स्त्रियांचे ठिकाणी देखील श्रद्धा व पावित्र्य आढळून येणे कठिण होऊन बसेल.'

भाऊसाहेब सांगत असत, की वरील गोष्टी बोलत असता श्रीमहाराज इतके गंभीर आणि प्रतिभायुक्त दिसत होते की, त्यावेळी हजर असणाऱ्या आठदहा मंडळींना मोठे आश्चर्य वाटले .... : ... . शेवटी श्रीमहाराज बोलले

पुढे येणारा काळ फार कठिण खरा. हा काळ पूर्वीच्या काळापेक्षा कठिण आहे; कारण पूर्वी माणसाची बुद्धि शाबूत होती. आता यापुढे माणसाची बुद्धि भ्रष्ट होऊन जाईल. दृश्यापेक्षा सूक्ष्मांतील संकट फार भयंकर असते म्हणून यावेळी सर्व साधनापेक्षा भगवंताच्या नामाचे महत्त्व फार आहे. गावामध्ये खूप थंडी पडली तर ती थंडी नाहीशी करीत बसण्यापेक्षा आपण स्वत: बंडी घालतो, त्याचप्रमाणे जगाचा प्रवाह भलत्या मार्गाने जाऊ लागला असता आपल्यासारख्या सामान्य माणसाने जगाला सुधारण्याच्या भानगडीमध्ये न पडता स्वत: भगवंताच्या नामाला घट्ट धरून ठेवावे. प्रवाहाचा जोर असल्यामुळे काही काळ आपण त्याच्या बरोबर वाहात जाऊ; पण नामाचा आधार असल्यामुळे आपले डोके पाण्याच्या वर राहील व आपण बुडणार नाही, हे खास समजावे. . . ."

★ ★ ★

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डॉ. देशपांड्यांचा ‘ क्षोभ ’!

लेे. ब. स. येरकुंटवार

‘ क्षोभो लेखत्वमागतः ’ !

‘ युगवाणी ’ च्या डिसेंबर १९५९ च्या अंकात डॉ. अ. ना. देशपांडे यांचा ‘ ज्ञानेश्वराचा क्षोभ ’ या मथळ्याचा रसमीमांसा करणारा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्या लेखाचा एकूण असा थाट वाटला, की लेखकाच्या अंतःकरणात आतल्या आत काही तरी धुमसत आहे, पण ते निर्भडेपणाने प्रकट करण्याचे धैर्य मात्र त्याला होत नाही. आणि म्हणूनच त्याने दबकत अशी कुरकुर केली आहे की “ आनन्द हा शब्द आपण अगदीच गुळगुळीत व बुळबुळीत करून टाकलेला आहे, अगदीच बेचव करून सोडलेला आहे. त्याल काटेकोरपणा कसा तो माहितच नाही. टोकदारपणा कसा तो त्याच्या अंगी उरलेलाच नाही. मनाची कोणतीहि सुखसंवेदनात्मक अवस्था असो; तिची जाणीव झाली रे झाली की तिच्याकडे ‘ आनंदा ’ चे टोक वळलेच म्हणून समजा; इतका तो विनबुडाचा झाला आहे. सगळीकडे सगळा आनंदच आनंद आहे ! ” इ. डॉ. देशपांड्यांसारख्या अद्वैतवेदान्त्याचा ‘ आनन्द ’ शब्दासंबंधीचा क्षोभदेखील विचारप्रक्षोभक ठरावा हे उचितच नाही काय ? योगवासिष्ठकारांनी म्हटलेच आहे, की ‘ याहि स्वैरकथास्तेषां उपदेशा भवन्ति ताः ’ !

डॉ. देशपांड्यांना ‘आन्दाचे हाल’ पाहवत नाहीत. ते हाल पाहून त्यांच्या ठिकाणी क्षोभ उसळला आणि, आदिकवीचा शोक श्लोकाच्या रूपाने साकार झाला (शोकः श्लोकत्वमागतः) तसा डॉ. देशपांड्यांचा क्षोभ या लेखाच्या रूपाने साकार झाला. ‘ क्षोभो लेखत्वमागतः’ लेखाच्या शेवटचे वाक्य त्यांच्या लेखनाच्या क्षोभजन्यतेवर चांगला प्रकाश टाकते. ते म्हणतात, “ आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून, सौंदर्यास्वादात किंवा कोणत्याहि प्रकारच्या रसप्रतीतीत आनंद नाही, क्षोभ आहे हे पटावे. इतक्याहि उपर न पटल्यास मग आनंदच आहे.” या उपरोधात्मक वाक्यावरून त्यांच्या मनातली कोणती तरी खळबळ त्यांना क्षुब्ध करीत आहे हें स्पष्ट होते.

सौंदर्यानुभूतींतील डॉ. देशपांड्यांची अस्वस्थता !

आणि क्षोभाचा स्वभावच असा आहे, की गंभीर व साधकबाधक विचार करण्यास अवश्य असलेली बुद्धीची निश्चलता तो बिघडवून टाकतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डॉ. देशपांडयांनी घेतलेले आधार व मांडलेले मुद्दे पाहिले, की हे सत्य पुनः नजरेस येते. आपला क्षोभ व्यक्त करण्यास डॉ. साहेबांनी श्रीज्ञानेश्वरांना वेठीस धरले आहे. बलिदानापूर्वी जसे पूजन करावे तसे श्रीज्ञानेश्वरांचे स्तवन पूजन करून, त्यांच्या ' क्षोभ ' शब्दावर डॉ. देशपांडयांनी आपल्या मीमांसेची इमारत उभारली आहे. डॉ. साहेबांचे एका बाबतीत मात्र जाहीर अभिनंदन केले पाहिजे· ती बाब ही की त्यांनी स्वतःचे अंतःकरण काहीहि आडपडदा न ठेवता, संकोच अथवा लज्जा यांच्या फुसलावणीस न भुलता, अगदी खुले केले आहे. ते म्हणतात· की सौंदर्य दर्शनानंतर ते स्वतः अस्वस्थ होतात; इतकेच नव्हे तर "एखादा चित्रपट पाहत असताना आपण जेव्हा वीररसाचा वा उत्तानशृंगाररसाचा वा उत्कट करुणरसाचा अनुभव घेतो तेव्हा आपल्या शरीराची व मनाची एकंदर अवस्था कशी होते हे प्रामाणिकपणे आठवावे म्हणजे रसाचा गाभा शोभायमान नव्हे तर क्षोभायमान कसा आहे, क्षोभाने कसा व्यापलेला आहे हे एकदम पटते.' असेंहि ते मोकळेपणाने कबुल करतात. रसिकाग्रणी डॉ. देशपांडे वीररस, शृंगाररस, करुणरस अनुभविताना क्षुब्ध, अस्वस्थ, बेचैन होतात व त्या त्या रसाचे अनुभाव त्यांच्यात सळसळत उठतात हे कबूल करण्यास त्यांचा केवढा मोठा प्रांजळपणा आहे ! या रससंचाराच्या प्रसंगी त्यांचे शरीर व मन सांभाळण्यास कुणीतरी सोबतीस त्यांना लागतच असेल हे सांगावयास नको !!

श्री. ज्ञानेश्वरीचा विपर्यास

आता त्यांनी स्वतःच्या क्षोभाचे समर्थन करण्याकरिता श्रीज्ञानेश्वराचा जो आधार घेतला आहे, त्याकडे वळू. डॉ. देशपांडयांनी एखादा चित्रपट पहावा, तसा अर्जुन श्रीकृष्णाचे विश्वरूप पहात होता असा जो भास त्यांनी उत्पन्न केला आहे, तो यथार्थ व अचूक आहे काय ? डॉ. साहेब स्वतःच म्हणतात, की श्रीकृष्णाने अर्जुनाला भव्यभीषण असे रूप दाखविले, 'भव्यभीषण' रूप आणि 'सौंदर्यातिशय' या दोन गोष्टी एकाच अधिष्ठानावर व एकाच काळी संभवनीय आहेत काय ? प्रत्यक्ष गीताच असे सांगते, की रूपपटाच्या पहिल्याच घडीच्या उकलाने अर्जून विस्मयाविष्ट झाला होता, घाबरला होता, दडपला गेला होता. याचा अर्थ असा, की अर्जून हा रसास्वादाच्या अवस्थेंत असणारा रसिक नव्हता. तेव्हा तो क्षोभाच्या अवस्थेत होता हे स्वाभाविकच आहे. श्री ज्ञानेश्वरानी त्याच्या या अवस्थेचे वर्णन करताना भक्तिभावाने 'शृंगारशोभा' यासारखे शब्द वापरले ते मूळ अर्जुनाचा क्षोभयुक्त अवस्थेचे द्योतक असण्यापेक्षा, कवीची भक्ति व अर्जूनाची भीति यांच्या संमिश्रणाचेच अधिक द्योतक आहेत. तेव्हा तेवढयावर रसमीमांसा करण्याची करामत कशी करता येईल ? पुनः असें, की शृंगारशोभा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हा शब्द तिथें जो आला आहे, तो सौंदर्यदर्शक व शृंगार रसजनक या अर्थच्छटेने आला नसून, विश्वरूपाचा 'नाना आभरणीं भरले। विश्वतोमुख ॥' या अर्थच्छटने आला आहे. श्री ज्ञानेश्वरच, डॉ. देशपांड्यांनी दिलेल्या ओवीच्या थोड्या पुढच्या ओवीत म्हणतात. 'म्हणोनि आश्चर्याचा पुरीं एकीं। पडिला ठायेंठाव थडी ठाकी। तंव चमत्काराचिया आणिकी। महार्णवी पडे ॥' आणि साक्षात्, गीतेनेहि रूपपटाच्या या पहिल्या घडीस 'अनेकाद्भुतदर्शनम्' व 'सर्वाश्चर्यमयं' असेंच म्हटलें आहे. श्री ज्ञानेश्वरांच्या शब्दाच्या आधारावर डॉ. देशपांडे असें विधान करतात, की 'उन्मादक सौंदर्याच्या आस्वादाने ज्याच्या ठिकाणी **असा** 'क्षोभ' उत्पन्न होत नाही तो रसिक कसला? म्हणजे, श्रीकृष्णाचे विश्वरूप हे उन्मादक सौंदर्याने मुसमुसलें होते, अर्जुन त्या उन्मादक सौंदर्याचा आस्वादक म्हणजे रसभोक्ता होता त्याची आश्चर्यमूढता, रोमांचितता, भयभीतता इ. भाव रसचर्वणेचे द्योतक होते, असें थोडक्यांत देशपांडेप्रणीत विश्वरूपदर्शनाचे 'नवदर्शन' आहे! गीतोक्त विश्वरूप म्हणजे जसे काही मदनोन्मत्त रमणीचे प्रणयविभ्रमच आहेत!!

अस्वस्थता कशामुळे?

डॉ. देशपांड्यांच्या क्षोभ–सिद्धांताचे विश्लेषण करण्याकरिता आपण एक उदाहरण घेऊ. 'मृच्छकटिक' नाटकांतील तो प्रणयरमणीय प्रसंग लक्षांत आणा. काळोखाच्या व ढगाळ रात्री वसंतसेना चारुदत्ताच्या घरी चालून आली आहे. दोघांचीहि गात्रे पावसाने ओलीचिंब झाली आहेत आणि तशाहि अवस्थेत ते परस्परास गाढ आलिंगन देत आहेत. चारुदत्त स्वतःचे जीवन धन्य झाले आहे, असें हर्षोत्फुल्लतेने गायन म्हणत करीत आहे. या प्रसंगाने, डॉ. देशपांडे, त्यांच्या खुल्या कबुलीप्रमाणे, अवस्थ, बेचैन होत असतील. हे आपणहि मानलेच पाहिजे! आता आपण विचार करावयाचा तो हा, की ते अस्वस्थ अथवा बेचैन का होत असतील? त्यांचा क्षोभ कशातून निर्माण होत असेल? स्वतःच्या जीवनातील असलाच काही प्रसंग उत्कटतेने आठवून, स्वताला चारुदत्ताच्या ठिकाणी ठेवून अशा प्रकारचा अनुभव स्वतःस न आल्यामुळे सहजतया उत्पन्न होणारी असूया भडकून अथवा तसल्याच कोणत्या तरी कारणाने उत्पन्न झालेल्या गुदगुल्या मानून? यापैकी कोणत्याहि कारणाने त्यांच्या ठिकाणी क्षोभ उत्पन्न होत असला, तर त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, की डॉ. देशपांडे रसिकाच्या अवस्थेत नसतात, नटाच्याच म्हणजे पात्राच्याच अवस्थेत असतात. म्हणजे त्या दृश्याचे वा सौंदर्याचे प्रत्यक्ष भोगजीवन ते जगत असतात; त्या त्या भावांचा भोग ते घेत असतात.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पात्र व रसिक हे एक कीं भिन्न

माझे म्हणणें अधिक स्पष्ट करण्याकरिता मी थोड्या वेगळ्या मार्गेत वरील मुद्दा मांडतो. नट व रसिक अथवा भावांची अभिव्यक्ति करणारे पात्र व रसिक हे एकच असतात की वेगवेगळे असतात? एकच असले तर रसमीमांसेस मग वाव कुठें आहे? तिची प्रवृत्तीच असंभवनीय नाही कां? भावांची मीमांसा केली की आपण विश्लेषणाचा गड जिंकला! भाव आणि रस जर एकच असली तर पात्र आणि रसिक असें द्वंद्वच असंभवनीय! डॉ. देशपांड्यासारखे सारे पुरुष प्रेक्षक मग चारुदत्तच आणि साऱ्या प्रेक्षिकाहि वसंतसेनाच! म्हणजे रंगमंदिर, सांघिक नृत्याप्रमाणें, सांघिक नाट्याभिनयाच्या दंगलीचे क्रीडास्थळ! सर्वजण क्षोभाने खवखवलेले!!

भावांची अभिव्यक्ति करणारें पात्र व रसिक हे एक नसले, तर मग त्या दोहोत असलेल्या भेदाचे नक्की गमक कोणते? डॉ देशपांड्यांनी जो गोंधळ केला आहे तो नेमका याच मुद्यांत. पात्रांतला भावजन्य क्षोभ व रसिकांतला आस्वादजन्य क्षोभ एकच नसेल, तर या दोन क्षोभांची वैशिष्ट्यें व नांवे कोणती या विचाराचा विटाळहि डॉ देशपांड्यांच्या रसमीमांसेस झाला नाही. आनंद हा शब्द गुळगुळीत, बुळबुळीत, अगदीच बेचव करून टाकल्याच्या कल्पनेनें डॉ. साहेबास क्षोभ झाला आहे आणि याच्या उलट त्यांनीं स्वतःच आपल्या हातानें क्षोभ शब्द त्याहिपेक्षां अधिक गुळगुळीत, बुळबुळीत व बेचव करून टाकला असल्यामुळें मला आनंद होत आहें! त्याचीं कारणें दोन. एक हे की, आताच म्हटल्याप्रमाणें, पात्र व रसिक याच्या क्षोभांत फरक न केल्यामुळें डॉ. देशपांड्यांनीं क्षोभ हा शब्द स्वतः भोंगळ केला आहे. दुसरें हे की तो दुसऱ्याहि प्रकारानें तसाच झाला आहे. 'सगळेच रस क्षोभवितात' हें त्यांचें वाक्य पहा. त्यांनीच आनंद या शब्दाचें भोंगळ रूप दाखविण्याकरितां म्हणून घेतलेलीं उदाहरणें (महासागरासंबंधी बोलतांना 'हा भला मोठा पाण्याचा साठा आहे; हिमालयासंबंधीं बोलतांना, 'हा भला मोठा डोंगर आहे'; पं. नेहरूंचा गौरव करतांना हे एक हिंदी गृहस्थ आहेत. ही तीन ठोकळ विधानें.) क्षोभासंबंधीहि तितकींच समर्पक व अचुक नाहीत काय? उदा– हास्य, वीर, इ. रसांतला क्षोभ आणि शृंगार, करुण, रौद्र इ. रसांतला क्षोभ हे एकाच जातीचे आहेत असें म्हणणें म्हणजे भोंगळपणाची कमालच नव्हे काय? डॉ. देशपांड्यांनीं पुरस्कारिलेला 'प्रक्षोभ रस' हा शब्दहि असाच भोंगळ व निरुपयोगी आहे. भारतीय रसमीमांसा व आधुनिक मानसशास्त्र या दोन्हीहि दृष्टींनीं डॉ. देशपांड्यांचा रसविमर्श उथळ व अशास्त्रीय कसा आहे तें पहा.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाव व रस यांतील भेद

भाव सुखदुःखात्मक असतात, पण सहृदय रसिकाच्या अंतःकरणात उत्पन्न होणारा व त्यास व्यापून टाकणारा रस नांवाचा मनोव्यापार मात्र आस्वाद्य असतो, असा भारतीय रससिद्धांत आहे. आस्वाद्यता म्हणजे पुन्हा पुन्हा सेवन करण्यास प्रवृत्त करणारा सुखद गुण. त्यास गोडी अथवा आनंद हा दुसरा शब्द. भरताने नाट्यशास्त्रात दिलेले विविध दृष्टांत व दिलेली स्पष्टीकरणे मननीय आहेत. त्यावरून हे स्पष्ट होते, की मुळातच निसर्गमाधुरी असलेले शृंगार, वीर, हास्य इ. रस आस्वाद्य म्हणजे आनंदरूप असतातच–कारण त्यांचे स्थायी-भावच तत्स्वरूप असतात. परंतु करुण, रौद्र, बीभत्स इ. रसहि संयोगविशेषामुळे आस्वाद्य म्हणजे आनंदरूप बनतात. कारण या रसांचे स्थायीभाव मुळात अनास्वाद्य व असुखद असले तरी, इतर भावाच्या मेळाव्याने रसनिष्पत्तीच्या अवस्थेत आस्वाद्य व सुखद बनतात. ऊन्ह स्वभावतःच दाहक. पण कडाक्याच्या थंडीत तेच आपणास किती गोड वाटते. तसेच रौद्रादि रसाचें मूळ भाव दुःखद पण रस मात्र सुखद. डॉ. देशपांडयांना भाव व रस यातला हा मूलभूत भेद उमजला नाही आणि म्हणून त्यांनीं घेतलेल्या आधारांचाहि विपर्यास केला आहे. उदा.:–चढे द्रष्टृत्वाचिया क्षोभा' हे श्री. ज्ञानेशांचे वर्णन भावाचे आहे, रसाचे नव्हे. डॉ. देशपांडयांना हे मान्य दिसते की रसाचे ओहोळ स्थायी भावातून निघतात. ते म्हणतात, '...रसिकांच्या ठिकाणी होणारी एखाद्या रसाची निष्पत्ति म्हणजे ह्या रसाशी सलग्न असलेल्या स्थायिभावाचे उद्दीपनच आहे' या विधानात रस आणि स्थायीभाव यांचा व्यक्त झालेला संबंध मूळ भारतीय रसमीमांसेचाच आहे. प्रश्न असा आहे की, स्थायीभावाचे उद्दीपन हे म्हणणे शास्त्रीय व वास्तविक आहे काय ? स्थायीभावाचे उद्दीपन झाले तर ते भावच जागृत होतात, रस निर्मिति होत नाही. उदा. एखाद्या कलाकृतीने अंतःकरणात प्रत्यक्ष किळसच उत्पन्न झाली, म्हणजे केवळ स्थायीभावच जागृत झाला व परिपुष्ट केला गेला, तर त्या कलाकृतीविषयी अनास्वाद्यतेमुळे मनात हेवताच उत्पन्न होईल. तिचा पुनः आस्वाद घ्यावा असे अभिरुचीचा अनुभव असलेल्या सहृदय रसिकास वाटणार नाही. परंतु संयोगविशेषाच्या चतुर योजनेने माफक प्रमाणातच जुगुप्सा भाव जागृत झाला आणि परिपुष्ट होण्याच्या ऐवजी मेळाव्यात भाग घेणाऱ्या इतर भावामुळे तो आस्वाद्य झाला, तरच त्या कलाकृतीने रस निष्पत्ति होऊन, 'पुन्हा हवे' असे आस्वादकास वाटेल. याचा अर्थ हाच की, स्थायीभावाचे एकांत उद्दीपन रस विघातक असते, त्याची माफक अभिव्यक्ति मात्र रसजनक असते. शृंगार-रसाचेंहि असेच रति या स्थायीभावाचे रसिकात एकांत उद्दीपन होत असेल

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तर ती कलाकृति भडकपणामुळे रसनिष्पत्तीच्या आड येते असे तरी म्हणावे लागेल. [कारण रति या स्थायीभावाची माफक अभिव्यक्ति न होता त्याचे उद्दीपन झाले तर रसिक स्वतःच्या रसिकत्वाचे भान विसरून जाऊन, डॉ. देशपांड्यांप्रमाणे बेचैन, क्षुब्ध होईल व कदाचित् रंगमंचकाकडेहि धावून जाईल!] अथवा प्रेक्षक अनेक मनोदोषांमुळे आस्वादकाच्या अवस्थेत नाही, असे तरी म्हणावे लागेल. (या मुद्याचा काहीसा जास्त उहापोह मी माझ्या 'नवरसामाझारि शृंगारसा' या लेखमालेच्या पहिल्या लेखांकात केला आहे. 'युगवाणी' सप्टें. १९५५) याचा मथितार्थ असा, की कलाकृति वा सौंदर्याचे अधिष्ठान असलेली वस्तु व रसिक यांच्या काही विशेष अवस्थांतूनच रसनिर्मिति होते, एरव्ही मात्र स्थायी भावांचे उद्दीपनच होते. आणि हे उद्दीपन झाले, की कलावस्तूची व रसिकाची प्रकृति संपुष्टात येते व प्रत्यक्ष भावजीवनच सुरू होते. क्षोभ हा शब्द भावजीवनास शोभतो, रसानुभूतीस शोभत नाही. मानवाच्या जीवनात भावांच्या क्षोभाचा प्रसंग नित्याचाच आहे. तेव्हा हा प्रसंग व कलाकृतीने निर्माण होणारा क्षोभाचा प्रसंग यात भेद दाखविण्याकरिताच 'रस' ही संज्ञा निर्माण झाली. आणि दोन क्षोभातील व्यावर्तक लक्षण 'आनन्द' या शब्दाने व्यक्त करण्यात आले. भाव व रस यात भिन्नता आनंदजनक अंशामुळेच आहे. क्षोभ हा शब्द व्यावर्तक नाही, आनन्द शब्दच त्या दृष्टीने यथार्थ आहे आणि म्हणूनच अभिनवगुप्ताचे 'सर्वेऽमी सुख सम्भवाः' हें म्हणणे शास्त्रीय आहे. रस हा अलौकिक आहे हे म्हणणेहि, व्यवहारातल्या क्षोभाहून तो वेगळा आहे, हे दाखविण्याकरिताच आहे. हा बारकावा न समजणारे डॉ. देशपांडे म्हणूनच असे लिहितात की 'काही विकार सुखवितात; काही दुःख देतात; काही रस दिल खुलवितात तर काही डोळ्यात अश्रु आणून रडवितात, काही भिववितात तर काही चकित करतात .....' इ. ही शब्दरचना केवढी ढिलीढाली व अशास्त्रीय आहे! भाव व रस यातले मर्म न कळल्यामुळे, एवढा मोठा विद्वान्हि कशी भोंगळ विधाने करीत सुटला आहे! विचक्षण वाचकांना इथे मुद्दाम सुचविण्याची गरज नाही, की भारतीय रसमीमांसेतील विविध रसविवाद मी तूर्त बाजूस ठेवले आहेत.

दोन्हीहि शास्त्रांवर अन्याय

डॉ. देशपांड्यांनी क्षोभ आणि excitement या दोन शब्दांची अतिशय गफलत केली आहे. पाश्चात्य शास्त्रात येणारा excitation हा शब्द भारतीय क्षोभ या शब्दाशी समानार्थक नाही. मानसशास्त्रात वा इन्द्रियविज्ञानात excitation हा शब्द stimulation या अर्थी येतो. म्हणजे भारतीय रस-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मीमांसक ज्याला उद्दीपन विभाव म्हणतात त्याशी excitation चा संबंध आहे. आणि त्यातहि बारकावा असा आहे, की हास्यासारख्या मनोविकारासहि तो शब्द याच व्यापक अर्थाने तिथे वापरला आहे. डॉ. देशपांडयांनी 'क्षोभ' हा भारतीय अर्थच्छटेचा शब्द पाश्चात्य संदर्भाने वापरला असल्यामुळे, त्यांचे विवरण खरोखरच हास्यरसजनक झाले आहे! कारण उघड आहे. हास्यरसाच्या अनुभूतीत देखील अस्वस्थता कशी असते ते डॉ. देशपांडयांनी सयुक्तिकपणे मांडून दाखविलें नाही. हास्यादिकांनी क्षोभ म्हणजे अशांतता कुठे उत्पन्न होते? 'भारतीय शास्त्रानुसार 'हर्षादिभिश्च मनसो विकासो हास उच्यते' (अग्निपुराण, अ. ३३९ श्लोक. १४) अशी वस्तुस्थिति आहे. मनाचा विकास म्हणजे प्रफुल्लता ही अस्वस्थताच का? वीर रसाच्या बाबतीतहि असेच म्हणता येते. त्यातहि अस्वस्थता नसते. मग 'सर्वच रस क्षोभवितात' हे म्हणणे डॉ देशपांडे सारख्यांना शोभेल काय? मॅक्डुगल प्रभृतींच्या मानसशास्त्रात emotional excitement हा शब्द सर्वच भावांना वापरला जातो, परंतु भारतीय शास्त्रात क्षोभ हा शब्द काही मर्यादित अर्थाने वापरला जातो. भारतीय शास्त्रांप्रमाणे क्षोभ ही संपूर्ण अंत:करणाची एक विशेष अवस्था आहे. क्षोभ म्हणजे अशांतता. ती काम, क्रोध, जुगुप्सा, शोक, इ. स्थायीभावांमुळे उत्पन्न झालेली असो, की चिंता, संशय, लज्जा, असूया इत्यादि व्यभिचारी भावांनी उत्पन्न झालेली असो. त्या त्या भाव-भावनांच्या दुबळ्या लाटा उठणे व त्या सहजगत्याच जिरणे यामुळे अंतःकरणाची जी अवस्था होते, तिला भारतीय शास्त्रात क्षोभ ही संज्ञा नाही. त्या त्या भाव-भावनाचे कल्लोळावर कल्लोळ उसळणे व तो शमनाचा कितीहि प्रयत्न केला तरी न शमणे, याला क्षोभ ही संज्ञा त्यात आहे. stimulation याअर्थी असलेल्या excitation ला या मर्यादा नाहीत. तेव्हा डॉ. देशपांडयांचा अभिनव रसदर्पण कसा दिखाऊ व विकृत बिंब उमटविणारा आहे, हे अभ्यासक जाणतीलच. आधुनिक शास्त्र व भारतीय शास्त्र या दोहोंवर डॉ. साहेबांनी अन्याय केला आहे, दोहोंचाहि त्यांनी विपर्यास केला आहे, हे म्हटल्याशिवाय रहावत नाही.

महानुभावीय वाङ्मयाबद्दलचा परामर्ष त्याच्या तज्ज्ञांकडे सोपवून, मी वैदिक प्राचीन मराठी वाङ्मय व संस्कृत साहित्यशास्त्र याबाबत असे म्हणेन, की डॉ. देशपाडयांची 'प्रक्षोभरसा'ची वकिली वाया गेली आहे. प्राचीन वैदिक मराठी वाङ्मय हे मुख्यत: धर्मप्रधान असल्यामुळे, साहित्याच्या दृष्टीने ते काटेकोर समजणे गैर आहे. त्यातील शब्दरचना व तात्त्विक मांडणी साहित्य शास्त्रनिष्ठ नाही. तेव्हा त्याच्या बळावर साहित्याचे सिद्धांत उभारणे अयोग्य आहे. एवढें सुचवून आनन्द या शब्दाकडे वळू

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डॉ. देशपांड्यांनी आनंद शब्दाला उपहासास्पद ठरविले आहे. याचे मूळ त्याच्या भाव व रस यासंबंधीच्या अविवेकात आहे. सौंदर्य आणि रस या गोष्टी एकच की भिन्न भिन्न, याचीहि शहानिशा अथवा विवेक त्यांच्या लेखात नाही. पण हे सर्व बाजूस ठेवले तरी, एक प्रश्न—आणि प्रस्तुत मुद्याच्या दृष्टीने तोच मौलिक महत्त्वाचा आहे—असा उत्पन्न होतो, की सौंदर्याच्या व रसाच्या आस्वादनात सहृदय रसिकांचे अंतःकरण कोणत्या अवस्थेत असते. भारतीय रसमीमांसेनुसार ते बहुंशी भावहीन अवस्थेत असते आणि म्हणूनच भरत म्हणतो, की 'दृश्यते हि भावेभ्यो रसानां अभिनिवृत्तिः न तु रसेभ्यो भावानां अभिनिर्वृत्तिरिति' (अ. ६, ३७) आधुनिक मानसशास्त्र देखील या अवस्थेत मनाची 'contemplative activity' (मॅकडुगल पहा) असते, असें सांगते. म्हणजे असे की भाव व त्याच्या उद्दीपनाने कमी अधिक प्रमाणांत उत्पन्न होणारे अनुभाव रसिकात त्यावेळी नसतात. इतकेच नव्हे, तर त्या सर्वांचा आस्वादनाच्या अंतर्मुख मनोवृत्तीत उपशम झालेला असतो. इतर सर्व भावप्रक्रिया त्यावेळी लीन झालेली असल्यामुळे काही मर्यादेत अंतःकरणाची स्वभावतःच 'यथादीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता' (गीता) अशी प्रशान्त अवस्था होते अशी प्रशान्त अवस्था आनन्द या संज्ञेने संबोधू नये तर कोणत्या संज्ञेने संबोधावी ? एक उदाहरण घेऊ. भयानक रस वठविणारी दृश्य वा श्राव्य कलावस्तु आस्वाद घेणाऱ्यास किंकाळी फोडावयास लावील, थरथर कापावयास लावील, अंगावर रोमांचाचा काटा उभा करावयास लावील, चेहरा काळवंडावयास लावील, दरदरून घाम फोडील, मूर्च्छा आणील अथवा धूम ठोकावयास लावील, तर ती भारतीय रसमीमांसेच्या दृष्टीने हीनकला आहे असेच म्हणावे लागेल. त्यात खरोखरच क्षोभ राहील, भयानक या रसाचा आनन्द रहाणार नाही. तो असावयास भयानकाचे विभाव सौम्य पाहिजेत. तसे असले तरच भयानक रसाने भय या स्थायीभावाचे अनुभाव उत्पन्न न होता, म्हणजे इतर सर्व भावकर्माची प्रवृत्ति रुद्ध होऊन, आनंदाची आंतरिक क्रिया चालू राहील. आजच्या कित्येक कलाकृती, भावक्षोभाच्या दृष्टीने सरस असूनहि, रसप्रमोदाच्या दृष्टीने नाइलाजाने हलक्याच ठरवाव्या लागतील. अंतःकरणाची प्रशान्तता म्हणजेच आनंदाची अवस्था येण्याकरिताच भारतीय रस शास्त्राने कित्येक संकेतात्मक विधिनिषेध घालून दिले आहेत. आधुनिक रस-शास्त्रास हे न कळल्यामुळे, त्यात संकेतहि नाहीत आणि विधिनिषेधहि नाहीत याचे रहस्य यात आहे, की आनन्दाची परिपूर्ण कल्पना भारतीय शास्त्रज्ञांना होती, आजच्या कलाकोविदांना ती नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कलाकुसुम कोमलच हवी

कोणतीहि कला ही नाजुक असावयास पाहिजे, कुसुमकोमल असावयास पाहिजे, हे मला वाटते, सर्वच सहृदय रसिक मान्य करतील. म्हणजे त्यात क्षोभजनक भावांचा धांगडधिंगा नको. पण या तत्त्वाचे, अथवा कलेच्या या राज-गुह्याचे असे आपण म्हणू, संपूर्ण दर्शन भारतीय रसमीमांसकांइतके दुसऱ्या कोणास झालेले दिसत नाही. त्याचे गमक ध्वनि सिद्धांत हे होय. ध्वनीने कलाकृतीत कुसुम-कोमलता येते. 'रसध्वनि सिद्धांत' हा जगातील सर्व रसमीमांसेचा मेरुमणि म्हणता येईल, इतका तो मूलगामी व व्यापक आहे. कलांना स्वादुता रसध्वनीने येते, त्यानेच त्या कान्तकोमल बनतात. ही कान्तकोमलता त्यातील आनन्दजनक-त्वामुळे येते. आनंदहि स्वभावत: कोमल असतो. भाव नग्न असतात, रसजनक कला मात्र आनंदाच्या तलम व नाजुक वस्त्राने परिवीत असल्यामुळे, एखाद्या कुलरमणीप्रमाणे आल्हाददायक असतात. त्यामुळेच तीत मांगल्य व चारुत्व संभवते. कलेत सुकुमारता असली, तरच ती खरी आस्वाद्य ठरते हे एका लहानशा व नित्याच्या अभिप्रायावरूनहि दृग्गोचर होते. आपण म्हणतो, 'अमुक अमुक कलाकाराने मोठ्या नाजुक हाताने आपली कलाकृति हाताळली आहे.' कठिण असलेल्या दगडासहि लोण्याप्रमाणे मऊ करणारा शिल्पकार सर्वश्रेष्ठ तेव्हाच ठरतो, की जेव्हा त्याला कलाकृतीतहि रसध्वनीच्या साह्याने नाजुकपणा आणता येतो. हैद्राबाद येथील सालरजंगच्या सुप्रसिद्ध अजबबंगल्यात एका फ्रेंच शिल्पकाराने अप्रतीमपणे घडविलेला एक पुतळा आहे. नग्न स्त्रीचे सर्व अवयव सूचित करून वर झिरझिरीत वस्त्राचे अवगुंठन, त्याच्या सर्व बारिकसारिक घड्या व वळ्या यासह त्याने त्या पुतळ्यात दाखविले आहेत. रसाचेहि असेच आहे. त्याच्या मुळाशी असलेला नग्न स्थायी-भाव आंतून ध्वनित होतो व इतर भावांच्या संयोगाने त्याची हळुवार व मधुर रुणझुण रसिक हृदयात निनादत असते. रसिक-हृदयात अनुरणन व चर्वणा ह्याचीच होते.

उत्साह व विस्मय यांचा भाग

एक दोन मुद्यांचे ओझरते दिग्दर्शन करून हे त्रोटक विवरण संपवू. अभिनवगुप्तादि रसमीमांसकांचा 'साधारणीकरणा'चा सखोल मानस सिद्धांत जोवर खोडून काढता येत नाही, तोवर डॉ. देशपांड्यांचा 'क्षोभ' अजागलस्तनवत लोंबकळतच रहाणार. 'आनंद' हा जातिवाचक शब्द आहे, प्रत्येक रसाचा आनंद मात्र भिन्न भिन्न आहे, हे अभ्यासक जाणतातच. ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे शांत रसाच्या बाबतीत डॉ. देशपांडे यांनी दाखविलेला वेगळा चार दिशाभुल

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करणारा कसा आहे, हेहि लक्षात येईल. क्षोभसिद्धांताचा फोलपणा आणखी एका मुद्याच्या दृष्टीने स्पष्ट होण्याजोगा आहे. शार्ङ्गदेवाने 'संगीत रत्नाकरांत', असे म्हटले आहे की, 'उत्साहविस्मयौ सर्वरसेषुव्यभिचारिणौ' (७,१५३४) मॅक्डुगलनेहि एक प्रकारे असेच म्हटले आहे. (The energies of Men) कलावंतांच्या नैपुण्याने कलाकृतीत जो विस्मयावह भाव ओतलेला असतो, त्यामुळें रसिक भारावून जातो, हेलावून जातो. अलौकिक कलानिर्मिति रसिकांच्या अंतःकरणास जशी चक्क करिते, तशीच ती त्याच्या ठिकाणीं एक प्रकारचा उल्लास चेतविते. रसिकांच्या अंतःकरणातील उत्साह व विस्मय यांच्या इतर भावाशी होणाऱ्या मेळाव्यामुळे कलाकृति अधिक आनंदजनक होते. कारण उत्साह व विस्मय हे स्थायीभाव क्षोभजनक नसून आनन्दजनक आहेत. भारतीय रसमीमांसेत वारंवार येणारा 'चमत्कार' हा शब्दहि पहा. यापूर्वी आलेल्या मुद्यांचे सविस्तर विवेचन करणे या लेखाच्या मर्यादेत बसणे अशक्य आहे. 'दिङ्मात्रामिह दर्शितम्' असेच म्हणणें भाग आहे. असो.

डॉ. देशपांड्यांचा संस्कृत साहित्यशास्त्राचा व्यासंग कितपत आहे याची मला कल्पना नाही. परंतु त्यांनी, आनंदाच्या सिद्धांतापेक्षा खरोखरच भोंगळ व अवास्तव असलेला क्षोभ सिद्धांत रूढ करण्याच्या अगोदर, भारतीय रसमीमांसा खोडून दाखवावी. त्याशिवाय त्यांचे प्रतिपादन शास्त्रीय होणार नाही. भारतीय रसमीमांसेचे मूलभूत सिद्धांत पद्धतशीरपणे न खोडता 'आनंद' शब्दावर केवळ गुरगुर केली तर ती कोण मोजणार! आणि ती कोणी मोजली नाही, तरीहि मग पुढे क्षोभच क्षोभ!! असो.

★ ★

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माणूस !

दिनकर वामनराव देशपांडे

शिवा माणूस होता ! ....

भिकारी होता पण माणूस होता. माणसारखेच सारे अवयव होते त्याला. माणसासारखाच दिसत होता तो. हातपाय धडधाकट होते. नाक, डोळे, सारं कसं जागच्या जागी होतं. कुठं उणीव म्हणून नव्हतीच त्याच्या सांगाड्यात. अगदी थेट माणसारखा माणूस !

वैगुण्य असं एकच होतं ....

समाजाच्या दृष्टीनं तो भिकारी होता नि तरीहि तो माणूस होता ! जगात माणसं काय थोडी आहेत ? पुष्कळ आहेत. नाकी डोळी नीटस नि गोरी गोमटी सुद्धा आहेत. सुखी आहेत. सधन आहेत. श्रीमंत आहेत नि गरीबहि. सुशिक्षित आहेत अशिक्षितहि आहेत. पण ते सर्व माणसारखे दिसतात. म्हणूनच केवळ त्यांना माणसं म्हणायचं, ·माणुसकी नसलेले माणसासारखे दिसणारे चालते बोलते सांगाडे आहेत नुसते ! —नुसते सांगाडे ! !

आणि शिवा ? ....

तो भिकारी होता, पण माणूस होता ! माणुसकीचा मूर्तिमंत पुतळा होता. दरिद्री–भिकारी होता पण तरीहि माणूस होता. जिवाला जीव देणारा शिवा भिकारी असूनहि पुरेपूर माणूस होता !

होय, होता ! आणि आज ? .... आज नाही !

आज शिवा नाही ! शिवाचा पवित्र आत्मा आज स्वर्गातील मंगल आसनावर आरूढ झालेला असेल; सुवास दरवळत असतील; परमात्मे शिवाच्या आत्म्याला आलिंगनं देत असतील; पऱ्या त्याच्या भोवती पिंगा घालीत त्याची पूजा करीत असतील; त्याचे गुणगान गात असतील नि फुलांचा पाऊस पाडीत असतील !

पण हे सारं स्वर्गात चाललेलं असेल ! आणि इथं ? या मर्त्य जगात ? परमेश्वरापेक्षाहि आम्ही श्रेष्ठ आहोत अशा दिमाखात–ऐटीत नाचणाऱ्या या सांगाड्याच्या जगात काय चाललं असावं इथं ? ....

इथं शिवाचे धिडवडे निघत होते ! ज्या शिवाची अनंत आत्म्याच्या पायघड्यावरून मिरवणूक निघायला हवी, तिथं त्याचे वाभाडे निघत होते

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

फुलांच्या राशी जिथं उधळायला हव्या होत्या, तिथं शिव्यांची लाखोली वाहिली जात होती—शाप दिल्या जात होते. कारण ? शिवा भिकारी होता ना !

शिवा भिकारी होता,— पण.................

पण तरीहि तो माणूस होता ! हे कदापिहि विसरता येणं शक्य नव्हतं. कर्णाच्या औदार्याला आव्हान देणारं औदार्य शिवाजवळ होतं; दुर्योधनासारख्या दुष्टांच्या कचीत सापडलेल्या बहिणीची लाज राखणाऱ्या श्रीकृष्णाचं सामर्थ्य त्याच्या जवळ होतं; भीमाची अचाट शक्ति शिवाजवळ होती आणि कळस म्हणजे धर्मराजाचा प्रामाणिकपणाहि शिवाजवळ पुरेपूर होता,— पण शिवाजवळ नव्हती फक्त श्रीमंती—वेगळी वैभव ! तो भिकारीच होता. आणि...............

— आणि तरीहि शिवा माणूस होता !...............

नव्हे,— शिवा म्हणजेच माणुसकीचा पुतळा !! अशा या शिवाचं अस्तित्व आज संपलं होतं. माणुसकीचा पुतळा आज जमीनदोस्त झाला होता. शिवाचा अंत झाला होता— अंत झाला होता ? तो तर निर्वाण पदाला पोचला होता ! छे, छे !— शिवासारख्या भिकाऱ्याला असं कसं संबोधता येईल ? भिकारी होता ना तो ! त्याच्या बाबतीत ओंगळ नि कुजकेच शब्द वापरायला हवेत !

शिवा मेला होता !!...........................

शिवाचा कोणीहि वारस नसल्यामुळं शिवाच्या प्रेताला शिव्या देत देत वर्गणी गोळा करूनच त्याचं प्रेत कसंबसं जाळून टाकण्यात आलं होतं ! शिवा मेल्यानंतरहि त्याला शिव्यांची लाखोली वाहिली जात होती. कारण मागे कुणीहि वारस न ठेवता तो मेला होता आणि प्रेत जाळण्याचा भूर्दंड देऊन मेला होता तो. शिवा मेला हाहि फारच मोठा गुन्हा केला होता त्यानं !

आणि तरीहि !...............................

शिवा माणूस होता हे कदापीहि नाकारता येण्यासारखं नव्हतं आणि नाकारता येणारहि नाही.

गेल्या दहा वर्षांपासून माझी शिवाशी ओळख होती ना ! नव्हे,— शिवाचा नि माझा दाट परिचय होता. शिवाला भेटल्याशिवाय माझा एकहि दिवस ढळला नव्हता. त्यानं कुठल्याहि अपेक्षेनं माझा परिचय करवून घेतला नव्हता. माझ्याकडून भाकरीचा तुकडा देखील तो कधीच घेत नसे. याचक म्हणून तो माझ्याकडे मुळी आलाच नव्हता. भिकारी असूनहि त्यानं माझ्यापुढं कधीहि पदर पसरला नव्हता. काहीहि घेण्यासाठी म्हणून तो येतच नसे. तो येत होता फक्त एकाच गोष्टीसाठी,— स्वत:ला लुटवण्यासाठी; स्वत:ला विसरण्यासाठी; माझ्या मुलाच्या संगतीत स्वत:ला रिझविण्यासाठी; माझ्या मुलाच्या प्रेमानं न्हाऊन निघण्यासाठी,— त्या निर्मळ आणि निरागस अशा आनंदासाठी !! आणि.—

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

– आणि स्वतःच्या मुलाचं दुःख विसरण्यासाठी ! ....

शिवाला एकुलता एक मुलगा होता. शिवाला बायको नव्हती पण मुलगा होता. शिवासाठी या पृथ्वीतलावर कोणतंहि पंचांग वा मुहूर्त नव्हता. शिवा समाजाचा घटक समजला जात नव्हता. कारण तो फक्त भिकारी होता. भिकाऱ्यासाठी पंचांगच नसतं मग मुहूर्त तरी कुठून येणार ! त्यामुळं कुठल्याहि देवाब्राह्मणासमक्ष शिवासमोर अंतरपाट धरल्या गेला नव्हता. अक्षता उधळल्या गेल्या नव्हत्या की वाजंत्री वाजली नव्हती. तरीहि शिवानं एका बाईबरोबर पांढरपेशा वर्गातल्या कुणाहि माणसानं केला नसेल असा, सुखासमाधानाचा संसार केला होता. निसर्गाच्या नित्य नियमाप्रमाणं शिवाच्या नशीबी बाप होण्याचं शिक्का-मोर्तबहि झालं होतं. या गोंडस बालकाला जन्म देता देताच शिवाची बायको म्हणून समजल्या जाणाऱ्या बाईनं आपले प्राण वेचले होते. "मुलाचा फुलासारखा सांभाळ करीन" असं वचन घेऊनच त्या बाईनं अखेरचा श्वास घेतला होता.

शिवानं शंभूचे लाड करण्यात काडीचीहि कसूर केली नव्हती. शंभू पाच वर्षाचा झाला असतानाच त्याच्या भविष्यासंबंधीची सुखस्वप्ने पाहण्यात शिवा दंग झाला होता. पण दैवाला भिकाऱ्याची सुखस्वप्ने देखील पाहवली नाहीत. दैव एखाद्याच्या मागं हात धुऊन लागतं म्हणतात ! शिवा या दुर्दैवाच्या तडाख्याला अपवाद ठरला नव्हता. भविष्यातील सुखस्वप्ने पाहण्यात दंग झालेल्या शिवाला पुरता बेहोष होण्यापूर्वी दैवानं त्याची धुंदी खाडकन् उतरविली होती !

शंभू ट्रकखाली चेंगरल्या गेला होता !! चिथडचा चिथडचा झाल्या होत्या त्याच्या. भिकाऱ्याच्या अंगावरील कपड्याच्या मच्छरदाणीलाहि लाज वाटावी अशी त्याच्या शरीराची चाळणी झाली होती. ट्रक मात्र शाबूत होता. ड्रायव्हर ? तो जिवंत होता. तो निरपराधीहि होता कारण ट्रकच्या मालकाचा पैसा त्याच्या पाठीशी होता. एका निष्कपट, निरपराध नि कोमल जिवाला क्षुल्लक मुंगीसारखं चिरडून टाकण्याचा कलंकहि कुणाला लागला नव्हता. कलंक-डाग-लागला होता तो फक्त त्या निर्जिव रस्त्याला.. कारण शंभूचं रक्त त्या ठिकाणी सांडलं होतं. शंभू निष्कारण चिरडल्या गेल्याची जाणीव होती फक्त निर्जीव रस्त्याला आणि स्मृतीचा असह्य जाच होता शिवाला ! कारण केवळ एका नैसर्गिक घटनेनं शिवा बाप झाला होता ! शिवामुळं शंभू जन्माला आला होता !!

त्या क्षणापासून शिवाचं लक्ष कशातच लागत नव्हतं भीक मागणंहि सोडून दिलं होतं त्यानं. कुणी मुद्दाम हाक मारून शिवाला तुकडा घातलाच तर तो घशाखाली कसाबसा ढकलण्याचा निष्फळ प्रयत्न करून कोंबडा आरवण्याची वाट बघत बसायचा तो !

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असाच एक दिवस आकाशातील तारे मोजत जाणाऱ्या शिवाला माझ्या मुलानं–राजूनं–हाक मारली आणि त्याच्या डबडयात भाजीपोळी घातली. शिवानं बाजूकडे टक लावून क्षणभर डोळे भरून पाहून घेतलं आणि लगेच त्याला कवटाळून ढसढसा रडायला सुरुवात केली. शंभूची तीव्र आठवण झाली होती शिवाला. पण या अनपेक्षित आणि विलक्षण प्रकारानं गोंधळून राजूनं मला हाक मारण्याचा सपाटा लावला. काय झालं म्हणून बाहेर येऊन पाहतो तो या जगावेगळया दृष्यानं माझं भान हरपलं. एक भिकारी वकिलाच्या मुलाला कवटाळतांना पाहून रक्ताचा गरम प्रवाह डोक्याकडे वेगानं वाहू लागला. संतापानं मी त्याला लाथ मारणार तोच त्यानं माझे पाय घट्ट धरले आणि कळवळून आपली कहाणी मला ऐकवली. त्या करुण कहाणीनं माझ्यासारख्या निगरगट्टाचेहि डोळे पाणावले. दुःखाचा कढ हळू हळू कमी होऊ लागला आणि माझ्यातला वकील जागा होऊ लागला. कीर्ति आणि ओघानंच पैसा मिळविण्याच्या सुप्त पण तीव्र आशेनं त्याची केस फुकट चालविण्याचं आश्वासन मी त्याला दिलं. पण

शिवानं–एका भिकाऱ्यानं–मला चांगलाच धडा शिकवला!—

शिवा म्हणाला,– "साहेब केस करून काय होणार आहे ? फार तर तुम्हाला कीर्ति मिळेल. तुमचा चांगला जमहि बसेल नि पैसाहि मिळेल. पण मला ? ड्रायव्हरला शिक्षा झाल्यावर मला मात्र त्याच्या बायकोचे, मुलाबाळांचे शिव्या शापच मिळतील. बापाच्या पापकृत्याची फळं मुलाबाळांना भोगायला लावायचा मला काय अधिकार आहे साहेब ? त्याच्या मुलाबाळांना उपाशी मरायला लावून माझा शंभूबाळ थोडाच परत येणार आहे ? साहेब, एक जीव गेला तेवढं पुष्कळ झालं. मला त्याचा बदला घ्यायचा नाही, बदला घेता येणारहि नाही. मी आज-पर्यंत कुणाचंच वाईट केलं नाही नि कुणाचं वाईट चिंतीतहि नाही. दुष्ट भावना आमच्या प्रकृतीतच नाहीत साहेब ! आणि बदला अशा रीतीनं कधी घेताहि येत नसतो. ज्यानं त्यानं आपल्या नशीबानं घ्यावं झालं. साहेब ! आपल्या पायाशी माझं गरीबाचं एकच मागणं आहे. मला रोज तुमच्या राजूशी थोडा वेळ बोलू देत जा, जवळ घेऊ देत जा. माझा शंभूबाळ मला परत मिळाल्याचं सुख आहे बघा त्यात !"

शिवाचं ते महान तत्वज्ञान ऐकलं आणि माझ्यातला वकील मटकन् खालीच बसला. आजपर्यंत माणसांचे अनेक नमुने मी पाहिले होते. पण खऱ्या अर्थानं माणसाचं–मानवतेचं–दर्शन, शिवाच्या रूपात त्या दिवशी मला प्रथमच घडलं होतं ! शिवाचा आणि माझा परिचय दहा वर्षांपूर्वी अशा रीतीनं झाला होता. पण आज . . . .

. . . . आज शिवा नाही !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शिवानं आठ दिवसापूर्वीच या जगाचा निरोप घेतला होता. शिवा सर्वांना भिकारी म्हणून माहित होता. एक भिकारी मेल्याचं दुःख कुणालाच झालं नव्हतं-होणारहि नाही. वास्तविक तो मेला नव्हता, तर जगातला एकुलता एक माणूस नाहीसा झाला होता आणि जगच माणुसकीला पारखं झालं होतं !

शिवाची ही वार्ता ऐकून माझ्या काळजात खोल, खोल कुठं तरी खुपु लागलं आणि एका दोघं निःश्वासाबरोबर स्वर तरंगत तरंगत हवेत विरले,—

" शिवा भिकारी होता, पण माणूस होता !! "

★ ★ ★

चुकीची दुरुस्ती

युगवाणी, मे १९६०, पान ५६

क्र. ७ मध्ये— " हिंदु कोडाचे कृष्णकारस्थान " ऐवजी " मराठ्यांचा उदयास्त " असे वाचावे.

क्र. ८ गळला आहे. तो टाकून तेथे

" ' हिंदू कोडाचें कृष्णकारस्थान '—

राव कमेटीच्या बिलामुळे हिंदुसमाजावर होणाऱ्या दुष्परिणामाचे विदारक चित्र रंगविले आहे.

★ ★ ★

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ललितकलेचे काही प्रश्न

प्रा. रा. श्री. जोग यांच्या विचारांची समीक्षा

(ले. पु. य. देशपांडे)

कला म्हणजे काय ? वाङ्मय आणि इतर ललित कला यांचे संबंध कशा प्रकारचे आहेत ? कलांचा विकास म्हणजे काय ? सुंदर आणि सत्य यांचा कलेशी संबंध कशा प्रकारचा आहे ? सौंदर्य हे वस्तुनिष्ठ की व्यक्तिनिष्ठ ? आणि कला ही स्वार्थ की परार्थ ? इत्यादि प्रश्न, साहित्य-कला-समीक्षकांना कलेच्या जन्मापासूनच सतावीत आहेत, असे दिसून येते. या प्रश्नांची चर्चा भारतात भरतमुनिप्रणीत नाट्यशास्त्रापासून आणि पाश्चात्य देशात आरिस्टॉटलच्या सौंदर्यशास्त्रापासून आजतागायत सुरू आहे. आणि तरीहि वर उल्लेखिलेल्या प्रश्नांपैकी एकहि प्रश्न निर्णायकपणे निकालात निघाल्याचे दिसून येत नाही. किंबहुना, हे प्रश्न कायमचे निकालात काढण्याची प्रवृत्तीच कलेच्या नित्यनूतन सर्जनशीलतेशी व तिच्या प्रकृतीशी विसंगत आहे, असेहि सार्थतेने म्हणता येते. कारण कलेची निर्मिति ही या प्रश्नांच्या चर्चेवर वा त्यांच्या निर्णयावर अवलंबून नसते. आधी कला स्वयंस्फूर्तीनेच निर्माण होते आणि नंतर रसिक व समीक्षक तिची चर्चा करूं लागतात, हे ऐतिहासिक सत्य आहे. रसिकांच्या मनावर होणारा परिणाम व समीक्षाकांचे टीकास्त्र यांचा प्रभाव कलाकारावरहि पडतो व त्यामळे त्यांच्या सर्जनशीलतेला कधी कधी त्यामुळे थोडे निराळे वळणहि लागलेले दिसते. पण असे असले, तरी कलानिर्मिति ही एक स्वयंस्फूर्त व स्वयंपूर्ण अशी घटना आहे हे ओळखल्या शिवाय कलेशी निगडित असलेल्या कोणत्याहि प्रश्नाची यथार्थ चर्चा होणे, असंभवनीय आहे. पण कलेच्या बाबतीत नक्की याच मूलभूत प्रश्नाकडे नेहमी दुर्लक्ष केले जाते आणि या दुर्लक्षाच्या आधारावर आधुनिक समीक्षकांचे पांडित्य सतत उधळले जाते.

समीक्षेचा प्राध्यापकीय घाट

ठाणे येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष या नात्याने प्रा. रा. श्री. जोग यांनी कलेबाबत वर उल्लेखिलेल्या प्रश्नांची जी चर्चा केली आहे ती अशा प्रकारच्या पांडित्याचाच एक मजेदार मासला आहे. त्यांची चर्चा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करण्याची पद्धत आकर्षक आहे. पण ती जितकी आकर्षक तितकीच रसिकांना व कलानिर्मात्यांना गोंधळात टाकणारी आहे

या लेखाच्या आरंभी उल्लेखिलेल्या कोणत्याहि प्रश्नावर प्रा. जोग यांनी नवीन असे काहीहि सांगितलेले नाही. पण नवीन काही तरी सांगितले जात आहे, असा आभास मात्र त्यांचे भाषण वाचत असतांना निर्माण होतो. आधुनिक मराठीतील समग्र साहित्य-समीक्षा ही बहुतांश अशाच प्रकारची आहे. प्रा. जोग यांनी हीच परंपरा चालवावी यात कसलेहि आश्चर्य नाही. अलीकडील बहुतांश मराठी-साहित्य-समीक्षा ही प्राध्यापकीय थाटाची झाली आहे. श्री. जोग हेहि प्राध्यापकच आहे. साहित्य-समीक्षेचा हा प्राध्यापकीय थाट व घाट मोठा मनोरंजक आहे. त्यात प्राध्यापकाला रसिक वा साहित्य-निर्माता असण्याची मुळीच गरज नाही. प्राध्यापकाची नोकरी मिळविण्याइतके विश्वविद्यालयीन परीक्षा प्रधान–कौशल्य असले की, काम भागते. आणि प्राध्यापकाला एकदा प्रतिष्ठा प्राप्त झाली की, कोवळ्या मनाच्या विद्यार्थ्यांपुढे, परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या दृष्टीने, त्यांना काय वाटेल ते सांगता यते. रसिकता व सर्जनशीलता यांच्याशी यत्किंचितहि संबंध नसतांनाहि ही प्राध्यापकी घाटाची मल्लीनाथी शाळा–कॉलेजातून वर्षानुवर्षे चालू राहते. विद्यार्थी-वर्गाच्या अलीकडील अनेक पिढ्या या अशा प्राध्यापकीय पांडित्याने 'संस्कारित' झाल्या आहेत, म्हणजे बरबाद झाल्या आहेत. परीक्षा पास होण्याच्या दृष्टीने दुसऱ्यांचे, विशेषतः पाश्चात्य पंडितांचे, ग्रंथ समजावून सांगण्याचा हा व्यवसाय कीतीहि उपयुक्त असला, तरी अस्सल सर्जनशीलता व अभिजात रसिकता यांच्याशी या प्रतिष्ठित व्यवसायाचा यत्किंचितहि संबंध नाही. असे असताहि कधीकधी काही प्राध्यापक साहित्य समीक्षेबाबत मोलाचे विचार व्यक्त करताना आढळून येतात. पण हा प्रकार अपवादभूतच असतो. या अपवादात प्रा. रा. श्री. जोग यांचे अध्यक्षीय भाषण घालता येत नाही, हे मी माझे दुर्दैव मानतो.

साहित्याचे मूळ

प्रा. जोग आपल्या पांडित्यप्रचूर भाषणात म्हणतात, 'साहित्याचे मूळ मानवाला आपल्या आणि आपल्यासारख्या इतरांच्या जीवनाविषयी वाटणाऱ्या कुतूहलात आहे, आणि म्हणून साहित्याचा विषय मानवजीवनदर्शन हाच आरंभापासून झालेला आहे. प्रारंभी मानवाचा अद्‌भुतावर विश्वास होता, आणि त्याचे त्याला आकर्षणहि वाटे. म्हणून त्यावेळी होणाऱ्या मानवजीवन दर्शनामध्ये अद्‌भुताची, अवास्तवाची बरीच भेसळ होईल व त्याचे प्रतिबिंब साहित्यामध्ये

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पडे, आपल्याकडील बृहत्कथासागर किंवा कादंबरी या वाङ्मयकृतीतून किंवा ‘अरेबियन नाइट्स’ सारख्या परकीय ग्रंथामधून अ-वास्तवाचे हे दर्शन वारंवार होई. त्यावेळच्या रसिकांचे त्यामुळे रंजन व समाधानहि होई. आपल्या पौराणिक वाङ्मयात व त्यावर आधारलेल्या आख्यानकाव्यात हे आपल्या प्रत्ययास येते. रसपरिपोषाच्या दृष्टीने ह्या अद्भुताचा किंवा अवास्तवाचा परिणाम तत्कालीन वाचकांवर विशेष होई किंवा आजहि बाल वा अप्रौढ वाचकावर होणे अगदी शक्य आहे. अद्भुताचे हें सामर्थ्य किंवा उपयोगी यांची कैफियत कै. न. चिं. केळकर ह्यांनी अर्वाचीन मराठी साहित्यामधील आपल्या आधुनिक वाङ्मया-वरील लेखात सादर केलेली आहे. परंतु ललित वाङ्मयाचा अितिहास आपल्यास असे सांगतो की उत्तरोत्तर त्यामध्ये अद्भुताचा आणि अवास्तवाचा वापर कमी कमी होत आला असून त्याची जागा सत्य आणि वास्तव यांनी व्यापिली जात आहे. मानव समाज जसजसा प्रौढ होत जातो तसतसे त्याचे अद्भुताबद्दचे आकर्षण कमी होत जाते. **जे असत्य आहे, ते ललित असले तरी त्याला रुचेनासे होते.** भ्रांतिमूलक सौंदर्य त्याला मान्य होत नाही. त्याची अभिरुचि प्रौढ झालेली असते, सत्याबद्दलची त्याची जिज्ञासा प्रबल होते. अवास्तव त्याला आता रंजवू शकत नाही.

वरील उताऱ्यात साहित्याबाबत जो दृष्टिकोन व्यक्त झाला आहे तो इतका उथळ व बाळकरी आहे की, ज्या पाश्चात्य ग्रंथांच्या आधारावर तो उभारल्यासारखा वाटतो त्या ग्रंथांच्या कसोटीलाहि तो उतरणार नाही. ‘ साहित्याचे मूळ मानवाला आपल्या व आपल्यासारख्या इतरांच्या जीवनाविषयी वाटणाऱ्या कुतूहलात आहे ”---म्हणजे काय ? हे कुतूहल कोणाचे ? कलाकाराचे की कलेचा आस्वाद घेणाऱ्याचे ? आणि केवळ कुतूहल हे कलानिर्मितीला प्रेरक होऊ शकते काय ? जीवनाविषयी कुतूहल अनेकांना अनेक प्रकारांचे वाटू शकते. पण या अनेकांपैकी अत्यंत थोडे कलात्मक साहित्य निर्माण करण्यास समर्थ ठरतात. असे का व्हावे ? अर्थात् जीवनाविषयी केवळ कुतूहल हे कलात्मक साहित्याला प्रेरक ठरू शकत नाही कुतूहल हे फारच ढोबळ व सामान्य कारण आहे. अनेक प्रकारच्या प्रवृत्तीच्या व तज्जन्य कार्यांच्या मुळाशी ते असते. या अनेक प्रवृत्ति व तज्जन्य विविध कार्ये यांच्या अठरा धान्यांच्या कडबोळ्यांत सर्जनशील साहित्याचीहि बोळवण करणे, हा साहित्य समीक्षेचा भाग होऊ शकत नाही.

साहित्याचे मूळ कशात साठले आहे, हा सर्जनशीलतेच्या मुळाशी असलेल्या सूक्ष्म प्रक्रियेशी संबंधित असा प्रश्न आहे. पण सर्जनशीलतेचा व प्रा. जोग यांच्या भाषणाचा कसलाहि संबंध दिसून येत नाही. किंबहुना कलेला वा कलात्मक साहित्याला जन्म देणारी सर्जनशीलता म्हणजे काय, या मूलभूत प्रश्नाला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डावलूनच आधुनिक मराठी साहित्य समीक्षेचा बहुतांश पसारा आकारास आला आहे आणि दुर्दैवाने त्याला एक प्रकारची प्रतिष्ठाहि प्राप्त झाली आहे. पण वस्तुस्थिति अशी आहे की, सर्जनशील, म्हणजेच कलात्मक साहित्य, आणि इतर साहित्य, यांच्यातील भेद स्पष्ट झाल्याशिवाय अभिजात साहित्य समीक्षेला सुरवात देखील केली जाऊ शकत नाही. पण दुर्दैवाने आधुनिक मराठी साहित्य समीक्षेत हे भेदज्ञान अभावानेच तळपत आहे.

'अद्‌भुतापासून वास्तवाकडे'

" --साहित्याचा विषय मानवजीवदर्शन हाच आरंभापासून झालेला आहे प्रारंभी मानवाचा अद्‌भुतावर विश्वास होता," इत्यादि जी विधाने प्रा जोग यांनी केली आहेत, तीहि केवळ प्राध्यापकीय ठोकळेबाजीच्याच स्वरूपाची आहेत. या विधानातून साहित्याच्या प्रगतिबाबत जो सिध्दांत(?) प्रा. जोग यांनी काढला आहे, तो तर आश्चर्यजनकच मानावा लागेल. अद्‌भुताचा आणि अवास्तवाचा वापर कमी कमी होत जाणे आणि त्याची जागा सत्य आणि वास्तव यांनी व्यापिली जाणे, हीच साहित्याची प्रगतिद्योतक अशी दिशा आहे, असे प्रा. जोग म्हणतात.

पण त्यांना असे विचारावेसे वाटते की, अद्‌भुत म्हणजे काय ? सत्य व वास्तव म्हणजे काय ? 'अरेबियन नाइटस्' सारख्या परकीय ग्रंथातून व आपल्या पौराणिक वाङ्मयांतून "हे अवास्तवाचे दर्शन वारंवार होई."--असे प्रा. जोग म्हणतात. 'अरेबियन नाइटस्' हे अक्षर वाङ्मय आहे, आणि पुराणातीलहि अनेक कथा अक्षर वाङ्मयात मानाचे स्थान मिळविण्याइतक्या अस्सल कलात्मक आहेत. हे अक्षर वाङ्मय जुनाट, रानटी व कलाशून्य आणि अलीकडील दीडदमडीचे, ढोबळ डोळ्यांना दिसते तसे व मठ्ठ मेंदूंना वाटते तसे त्याच स्वरूपात पुढे माडणारे बहुतांश आधुनिक वाङ्मय हे "सत्य, वास्तव," "प्रौढ" व प्रगत—ही समीक्षा कलात्मक साहित्याची नसून 'मागणी तसा पुरवठा' या अर्थशास्त्रीय, म्हणजेच बाजारी वाङ्मयाची आहे. आणि बाजारी वाङ्मय हेहि कलात्मक साहित्य आहे, अशी प्रा. जोग याची ठाम समजूत दिसते; किंबहुना तेच खरे वाङ्मय व इतर सारे गूढगुंजन, अशीहि त्यांची धारणा दिसते !

अद्‌भुत, सत्य, वास्तव, इत्यादि, शब्दांना सर्जनशील, म्हणजेच कलात्मक साहित्यात कोणता अर्थ आहे, याची प्रा. जोगांना यत्किंचितहि कल्पना असलेली दिसत नाही. कलात्मक साहित्याची प्रगति-दिशा ही अद्‌भुताकडून सत्याकडे व वास्तवाकडे नसते. ती अद्‌भुताकडून अधिक अभिनव अशा कलात्मक अद्‌भुताकडे सत्याकडून वा वास्तवाकडून अधिक अभिनव आशा कलात्मक सत्याकडे वा वास्त-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाकडे असते. अलीकडील वाङ्मयात अद्भुताचा वापर दिसत नाही, याचा अर्थ एवढाच की, अद्भुताचा कलात्मक वापर कसा करावा, हे अलीकडील साहित्यिकांना समजत नाही वा साधत नाही. ही नालायकी प्रगतीचे वा प्रौढ अभिरुचीचे लक्षण ठरू शकत नाही.

अद्भुत म्हणजे असत्य, भ्रांतिमूलक, असे समीकरण प्रा. जोग मांडतात, ' मानवसमाज जसजसा प्रौढ होत जातो. तसतसे त्याचे अद्भुताबद्दलचे आकर्षण कमी होत जाते. जे असत्य आहे, ते ललित असले तरी त्याला रुचेनासे होते. भ्रांतिमूलक सौंदर्य त्याला मान्य होत नाही. त्याची अभिरुचि प्रौढ झालेली असते. सत्याबद्दलची त्याची जिज्ञासा प्रबल होते. अवास्तव त्याला आता रंजवू शकत नाही."

प्रा. जोग हे साहित्याबद्दल बोलत आहेत की, यंत्रयुगीन सामाजिक परिवर्तनाबाबत बोलत आहेत, याची खुद्द त्यांना देखील कल्पना असावी, असे दिसत नाही. सत्य-असत्य, 'ललित असत्य', 'भ्रांतिमूलक सौंदर्य' 'प्रौढ अभिरुचि' –इत्यादि त्यांचे शब्दप्रयोग अस्सल व अभिजात साहित्य–समीक्षेच्या क्षेत्रात इतके बिनबुडाचे ठरतील की, आपण हे वापरलेच कसे, याचे त्यांना देखील आश्चर्य वाटेल–अर्थात् ते अभिजात रसिक असतील वा होतील तर.

सत्य आणि सुंदर

प्रा. जोग यांचे 'सत्य आणि सुंदर' या बाबतचे विचार देखील याच मासल्याचे आहेत. ते म्हणतात, "इंग्लिश कवि कीट्स् याने 'काव्याच्या तंद्रीत एकदा याबद्दल जे उद्गार काढून ठेवले आहेत, ते सर्वस्वी प्रमाण मानून या दोन गोष्टी एकच आहेत, असे म्हणण्याची रूढीच पडल्यासारखे झाले आहे. हे उद्गार असे—Beauty is Truth. Truth is Beauty—that is all ye know on earth and all ye need to Know"

'काव्याच्या तंद्रीत' कीट्सला हे दर्शन झाले. पण प्रा. जोगांना 'काव्याची तंद्री' म्हणजे काय, याची यत्किंचितहि कल्पना नाही. उलट, तो एक अर्धवटपणा आहे. असे त्यांना वाटते. आणि म्हणून ही कविवचने 'बहुतेक कविवचनाप्रमाणे,' त्यांना 'अर्धसत्ये' वाटतात. आणि पूर्ण सत्य काय म्हणून विचाराल, तर ज्या अर्थी सत्य व सुंदर हे दोन वेगवेगळे शब्द आहेत त्या अर्थी त्यांचे अर्थहि वेगवेगळे असलेच पाहिजेत, म्हणून त्याचे समीकरण होणे शक्य नाही. केवढी प्रगाढ विद्वत्ता ही ! सत्य, शिव, सुंदर या पाश्चात्य त्रयीवर अथवा 'सत्-चित्-आनंद' या वैदिक भारतीय त्रयीवर जगप्रसिद्ध तत्त्वज्ञांनी, दर्शनिकांनी, कवींनी व समीक्षकांनी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ये जे लिहिले ते ते प्रा. जोगांच्या या प्रगाढ प्राध्यापकीय विद्वत्तेमुळे आता कायमचे अर्थशून्य होऊन बसणार !

वस्तुस्थिति अशी आहे की, ज्या माणसाला 'काव्याची तंद्री' म्हणजे काय, हे कळत नाही आणि 'जीवनदर्शन' म्हणजे काय हेहि कळत नाही, त्याने काव्य, कलात्मक साहित्य व साहित्य समीक्षा यांच्या वाटेसच का जावे हेच कळत नाही. 'आपल्याला यातले काही कळत नाही' अशी प्रांजल कबूली देऊन मोकळे होण्यातच प्रा. जोगांचा शहाणपणा दिसला असता. पण अशी कबूली देईल तर तो मराठीचा प्राध्यापक कसला ? प्राध्यापक आहे तर त्याला या विषयाबाबत बोललेच पाहिजे; आणि लोकांनी ते ऐकलेच पाहिजे त्याला मान्यताहि दिलीच पाहिजे, असा हा आधुनिक खाक्या आहे.

प्रा. जोगांचे भाषण वाचून त्यांना सत्य, शिव, सुंदर या शब्दाचे अर्थ तरी कळतात किंवा नाही याविषयी शंका वाटते. त्यांचे या विषयावरील विवेचन (?) इतके रसिकताशून्य व तत्त्वशून्य आहे की. त्यांनी साहित्यावर लिहिण्याचे व बोल, ण्याचे बंद केल्यास साहित्य कलाकारांवर व रसिकांवर त्यांचे फार उपकार होतील.

प्रा. जोग म्हणतात, "ताजमहाल सत्य आहे आणि सुंदरहि आहे; स्वर्ग किंवा स्वर्गकल्पना सुंदर आहे खरी, पण ते सत्य नाही असेच म्हणावे लागेल; आणि महारोगाचे अस्तित्व सत्य असले, तरी तो सुंदर नाही." ही विधाने यार्थ मानली तरी कलात्मक साहित्य निर्मितीशी व साहित्य समीक्षेशी त्यांचा काय संबंध आहे ? ताजमहाल डोळयांना दिसतो म्हणून सत्य आणि सर्वत्र त्याला सुंदर म्हणतात म्हणून सुंदर स्वर्ग डोळयांना दिसत नाही म्हणून त्याची कल्पना सुंदर असेल पण ती सत्य होऊ शकत नाही. आणि महारोग डोळयांना दिसतो म्हणून सत्य आणि मनाला भेसूर वाटतो म्हणून असुंदर प्रा. जोगांची ही मांडणी इतकी ढोबळ व गांवढळ आहे की, त्यांना प्राध्यापक तरी कां म्हणावे हे कळत नाही.

कलात्मकतेचे असंख्य प्रकार असे आहेत की ते डोळयांना न दिसले तरी ते जितके सुंदर तितकेच सत्य आहेत. किंबहुना, दिसते तसे नसते, अथवा जेवढे दिसते त्याच्या मागे अथवा त्याच्या गर्भांत अनंत अर्थसौंदर्य कसे भरलेले असते, हे प्रकट करून दाखविण्यातच कलात्मक प्रतिभेची खरी करामत असते. पण या करामतीचा स्पर्शहि प्रा. जोगांच्या अंतःकरणाला झाला असल्याचे दिसून येत नाही.

'सत्य ते सारे सुंदर, आणि सुंदर ते सारे सत्य, हा आग्रह खरा नव्हे'— असे प्रा. जोग म्हणतात. पण हा आग्रह कोणाचा ? कीटस्चा ? पण कीटस्च्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विधानात आग्रह कुठे आहे ? आपल्याला झालेले दर्शन त्याने कलात्मक शब्दात व्यक्त केले आहे. ते त्याचे 'जीवनदर्शन' आहे. सर्वांनी ते मान्य केलेच पाहिजे असा आग्रह कोणताहि अस्सल कलावंत कधीच करीत नसतो. ताजमहाल प्रा. जोगांना जितका सत्य व सुंदर वाटतो तितकेच कीटस्‌ला झालेले दर्शन त्याला सत्य व सुंदर वाटते. पण ताजमहाल डोळ्यांना दिसतो आणि कीटस्‌ला झालेले जीवनदर्शन पाहावयाला जे 'डोळे' लागतात ते प्राध्यापक जोगांपाशी नाहीत. म्हणून सारी पंचाईत. आणि आपण कलात्मक सत्य-सौंदर्याबाबत आंधळे आहोत, हे जाणून घेणे व ते प्रांजळपणे कबूल करणे, याला जी अभिजात माणुसकी लागते तीहि प्रा. जोगांपाशी आहेसे दिसत नाही. नाही तर या भाषणाचा अट्टाहास त्यांनी कशाला केला असता ?

सौंदर्य वस्तुगत की व्यक्तिनिष्ठ ?

या प्रश्नाबाबतची प्रा. जोगांची विचारसरणीहि वर वर्णिल्याप्रमाणे ढोबळ व गांवढळच आहे. ताजमहाल, अजंठ्याची लेणी, मेघदूतातील कल्पना सौंदर्य, गीत-गोविंदामधील वर्णमाधुर्य, मोनालिसाचे गूढ स्मित, इत्यादींचे सौंदर्य हे मतभेदातीत आहे, असे प्रा. जोग म्हणतात. का ? सर्व रसज्ञ असे म्हणतात म्हणून आणि या सर्वांतील सौंदर्य "व्यक्तिदृष्टिगत नाही; तत्तद्वस्तुगत आहे." का ? सर्वांनी ही गोष्ट मान्य केली आहे म्हणून. म्हणजे लोकमान्यता, हाच जोगांच्या मते, सौंदर्य हे तत्तद्स्वतुगत असते, याचा निर्णायक निकष आणि आज जे असे सौंदर्य काही कारणमुळे लोकमान्य व सर्वमान्य झालेले नाही, पण समजा उद्या झाले, तर ? तर प्रा. जोग हे उद्या तसेच म्हणतील. पण आज मात्र ते सौंदर्य व्यक्तिनिष्ठच असणार आणि उद्या त्याला सर्वमान्यता मिळाली की प्रा. जोग म्हणणार, ते सौंदर्य 'तद्वस्तुगतच' आहे !

हे असे होत नाही, असे नाही. व्हॅनगोची चित्रे कित्येक दिवस धूळ खात पडली होती व तो दरिद्र्यातच मेला. पण पुढे त्याची चित्रे इतकी जगमान्य झाली की, त्यामुळे, प्रा. जोगांच्या मते, त्या चित्रातील सौंदर्य एकदम 'तद्वस्तुगत' झाले. व्हॅनगो जिवंत असताना मात्र त्याच्या चित्रातील सौंदर्य हे केवळ व्हॅनगो या व्यक्तीच्या दृष्टिगत असेच होते !

आता या युक्तिवादाला काय म्हणावे ? सौंदर्य म्हणजे काय, याची प्रा. जोगांना यत्किंचितहि कल्पना नाही, यापेक्षा दुसरा कोणता निष्कर्ष या युक्तिवादातून निघू शकतो ?

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कला स्वार्थ की परार्थ ?

प्रा. जोगांनी सौंदर्याच्या वरील मीमांसेच्या (?) आधारे आणखी एक प्रश्न उपस्थित केला आहे व आपल्या त्याच प्राध्यापकीय पद्धतीने तो विवेचित आहे.

ते म्हणतात,–

"सौंदर्यविषयक व्यक्तिनिष्ठतेचे पर्यवसान कला स्वार्थ,. म्हणजे स्वत:च्या समाधानाकरता आहे की परार्थ, म्हणजे इतराकरता आहे, या वादामध्ये होते"

या वादाचे आपल्या प्राध्यापकीय पद्धतीने साधक–बाधक पण अत्यंत उथळ, ढोबळ व गांवढळ विवेचन करून प्रा. जोगांनी असा निष्कर्ष काढला आहे की, "अगदी प्राथमिक स्वरूपात स्वार्थ असणारी ही निर्मिति सध्याच्या प्रगत अशा स्वरूपात परार्थहि असते, हे मान्यच करावे लागेल."

म्हणजे काय ? म्हणजे काय ते प्रा. जोगांच्या वर्गात जाऊन बसा म्हणजे समजेल. स्वार्थ व परार्थ या शब्दांना कला निर्मितीच्या प्रक्रियेत कोणता अर्थ असतो, याची प्रा. जोगांना कसलीहि कल्पना असलेली दिसत नाही. सर्जनाची उसळी ही कळसूत्री बाहुल्याप्रमाणे असावी, असा प्रा. जोगांचा समज दिसतो. कळ दाबली, की झाले सर्जन–यंत्र सुरू. कळ दाबताना जे स्वार्थ असते तेच पुढे प्रसिद्ध झाले की परार्थ होते, असा त्यांच्या म्हणण्याचा आशय दिसतो.

उदाहरणार्थ, रवींद्रनाथांची 'गीतांजलि' हें काव्य स्वार्थ की परार्थ ? प्रा. जोग उत्तर देतील, निर्मितीच्या वेळी ते कवीला 'स्वार्थ' वाटले असले, तरी पुढे ते प्रसिद्ध होणार, याची कवीला जाणीव असलीच पाहिजे. नाहीतर ते त्यांनी प्रकाशित तरी कशाला केले असते ?–आता याला काय म्हणावे ? आम्ही तर प्रा. जोगापुढे अगदी हात टेकतो व शरणागति कबूल करतो !

"अरसिकेषु कवित्व निवेदनम् शिरसि मा लिख, मा लिख, मा लिख"– ही काव्योक्ति प्रा. जोगासारखे जे कोणी पंडित–प्राध्यापक त्या काळी असतील, त्यांना पाहूनच कवीला स्फुरली असली पाहिजे.

★ ★ ★

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

सांस्कृतिक कार्यक्रम समिति– शिवजयंति–उत्सव:

वि. सा. संघाचे वतीने दि. २७–४–६० रोजी घनवटे रंगमंदिरात रात्री ८-३० वाजता शिवजयंतिनिमित्त एक खास सांस्कृतिक कार्यक्रम संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. या शुभप्रसंगी श्रीमंत पु. बा. काळे आणि त्यांच्या कुटुंबातील मंडळींनी 'श्रीशिवाजी वाचनालयाला' दिलेल्या देणगीचा गौरवपर उल्लेख करण्यात आला. या कार्यक्रमात रंजन कला–मंदिरातर्फे शिवप्रभूचा जयजयकार करणारे गीत सादर करण्यांत आल्यावर श्रीपरमानंदकविकृत शिवभारतातील पाच निवडक प्रसंगावरील संस्कृत श्लोक निरनिराळ्या रागदारीत म्हणण्यात आले. यानंतर कविसंमेलन झाले. यात सर्वश्री आनंदराव टेकाडे, म. श्री. पंडित, व. कृ. वऱ्हाडपांडे, वसंतराव सवनीस सौ. उषाताई लिमये व सौ. प्रमिलाबाई भागवत यांनी शिवरायावर रचलेली गीते गाऊन दाखविली. यानंतर सहकारी संस्थेतर्फे 'आग्र्याहून सुटका' नाटका-तील मिर्झाराजे जयसिंग व श्रीशिवाजी यांचे भेटीचा प्रवेश सादर करण्यात आला.

प्रवचन–

दि. १२।५।६० रोजी सायं. ६-३० वा. 'एकनाथ कथासारामृत'कार ह. भ. प. श्री. भीमराव पारळकरशास्त्री यांचे "श्रीशिवाजी व श्रीसमर्थ-रामदास" या विषयावर सुश्राव्य प्रवचन झाले.

कै. बाळशास्त्री जांभेकर पुण्यतिथि–

शनिवार दि. २१।५।६० रोजी सायं. ७ वाजता कै. बाळशास्त्री जांभेकर पुण्यतिथीचा कार्यक्रम संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली झाला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. म. श्री. पंडित यांचे भाषण झाले.

विदर्भ साहित्य संघाला देणगी–

श्री. डॉ. एन्. एस. सहस्रबुद्धे, नागपूर यांनी सद्‌गुरू उपासनीबाबामहाराज यांच्या ९१ व्या जन्मातिथिनिमित्त वि. सा. संघास स्वतः लिहिलेली ३८ पुस्तके आणि श्रीसंत गुलाबराव महाराज कृत १३ ग्रंथ देणगी म्हणून दिले. याबद्दल वि. सा. संघ त्यांचा अत्यंत आभारी आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचे आजीव सभासद—

१. श्री. परशुराम बाळकृष्ण गानू, नागपूर ५० रु.
२. श्री. ज्ञानदेव घनश्याम मुंघाटे, गडचिरोली ५१ रु.

शाखावृत्त—

गोंदिया शाखा— दि.२७।४।६० रोजी गोंदिया शाखेतर्फे शिवजयंतीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

दि. १-५-६० रोजी सकाळी ९ वाजता 'महाराष्ट्र-दिन' जे. मा. हायस्कूलचे इमारतीत साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी वयोवृद्ध व विद्वान पुढारी श्री. चतुर्भुजभाई जसाणी होते. 'महाराष्ट्र गीता' नंतर श्री. ना. ह. तेलंग वकील यांनी भाषण केले. नंतर नगर कांग्रेसचे अध्यक्ष श्री. छेदीलालजी गुप्ता, वकील आणि श्री. सुखदेवजी अग्रवाल यांची भाषणे झाली. वंदेमातरम् नंतर कार्यक्रम संपला.

दुपारी १२ वाजता एका महाराष्ट्रीय दात्याचे देणगीमुळे वि. सा. संघाचे सभासदांना आणि निमंत्रितांना सरस्वती महिला-विद्यालयाचे इमारतीत 'झुणका भाकर' चे भोजन देण्यात आले.

* * *

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परीक्षा समिति वृत्त

वि. सा. संघाच्या परीक्षा समितीची सभा दि. १७-४-६० रोजी वि. सा. संघाचे कार्यालयात भरली. यावेळी पुढीलप्रमाणे अभ्यासक्रमात बदल करण्यात आला असून प्रस्तुत अभ्यासक्रम येत्या सप्टेंबर ६०च्या सत्रापासून अमलात यावयाचा आहे.

महत्वाची सूचना-साहित्य पारंगत परीक्षेच्या जुन्या अभ्यासक्रमानुसार प्रथम भाग उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थ्यांकरिता येत्या सप्टेंबर १९६० मध्ये द्वितीय विभागाची परीक्षा घेण्यात येईल. त्यानंतर जुन्या अभ्यासक्रमाप्रमाणे कोणालाहि परीक्षेस बसता येणार नाही. नवीन अभ्यासक्रमानुसारच अनुत्तीर्ण परीक्षार्थ्यांना परीक्षेस बसावे लागेल.

केंद्राधिकाऱ्यांना सूचना- नवीन अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांकडून अभ्यास करवून घ्यावा, ही विनंती. परीक्षा सप्टेंबर ६० च्या शेवटच्या आठवड्यात घेण्यात येईल.

माहितीपत्रकांबाबत सूचना- मराठी प्रवेश ते साहित्यस्नातक पर्यंतच्या माहितीपत्रक-अभ्यासक्रमाकरिता १५ नये पैसे मूल्य ठेवण्यात आले आहे.

साहित्य पारंगत परीक्षेचे माहितीपत्रक- अभ्यासक्रम ५६ नये पैसे पाठवून मागवावे. (पोस्टाच्या तिकिटा पाठविल्यास चालेल.)

वि. सा. संघ
नागपूर १

तु. वि. गेडाम
संचालक, परीक्षा समिति

---

१ मराठी प्रवेश

परीक्षा शुल्क रु. २-५० | वेळ दोन तास
१०० गुण

लेखी प्रश्नपत्र--

(लेखन, वाचन, संभाषण, वाक्प्रचार, म्हणी इ.) ७५ गुण
पाठ्यपुस्तक--मराठी प्रवेश (संपा. कोलते)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मौखिक--

वाचन-वाचलेल्या मजकुरातील आशय सांगता येणे. २५ गुण

संभाषण-ओळखीच्या परिस्थितीवर विचारलेल्या सोप्या प्रश्नांची उत्तरे देता येणे.

सहाय्यक पुस्तके--

(१) हिंदी मराठी भाषा प्रवेशिका-श्रीमती मालतीबाई श्रीखंडे.
(२) बाल इसापनीति-(के. भि. ढवळे प्रकाशन)

२ मराठी प्रारंभ

परीक्षा शुल्क रु. २-५० वेळ ३ तास
१०० गुण

१. सारस्वत पाठमाला भाग २ (संपादक प्रा. बनहट्टी)

अथवा

महाराष्ट्र साहित्य भाग २ (संपादक प्रा. कोलते)

अथवा

साहित्य सोपान भाग २ ६० गुण

२. गोड गोष्टी भाग २ (साने गुरुजी) २० गुण
व्याकरण, अनुवाद, म्हणी, वाक्प्रचार इत्यादिकरिता)

सहाय्यक--

विरामचिन्हे व शुद्धलेखन नियमावली (रा. ह. कुळकर्णी) २० गुण
व्याकरण प्रवेशिका भाग १ (भावे-कुळकर्णी)

३ साहित्य विनीत

परीक्षाशुल्क रु. ३-५० वेळ ३ तास

प्रश्न पत्र २

प्रश्न पत्र १ गद्य १०० गुण

१ मराठी गद्य (वि. सा. सं. प्रकाशन) ४० गुण

किंवा

गद्यबोध (प्रा. पां. कृ. सावळापूरकर)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

२ करीन ती पूर्व	(नाटक)	(वरेरकर)	४० गुण
किंवा			
उमाजी नाईक	(नाटक)	(देशपांडे)	
३ संक्षिप्त उष:काल		(आपटे)	२० गुण
किंवा			
भिल्लवीर कालिंग		(गो. नी. दांडेकर)	
किंवा			
सं. क्रान्ति		(साने गुरुजी)	
प्रश्न पत्र २ पद्य			१०० गुण
१ काव्य माधुरी		(मॉडर्न बुक डेपो, अकोला)	५० गुण
किंवा			
पद्यप्रभा		(डॉ. अ. ना. देशपांडे)	

वृत्तालंकार, व्याकरण, निबंध इत्यादि करिता सहाय्यक पुस्तके

१ निबंध नंदिनी		(पद्माकर निमदेव)	२५ गुण
२ वृत्तालंकार दीपिका		(पु. गो. निजसुरे)	
किंवा			
वृत्तदर्पण		(गोडबोले)	
३ व्याकरण प्रवेशिका	(भा २)	(भावे कुळकर्णी)	२५ गुण

४ साहित्य परिचित
(पदवीपूर्व)

परीक्षा शुल्क ५ रु.			१०० गुण
प्रश्न पत्र १ गद्य			
१ निबंध परिमल		(वि. सा. संघ प्रकाशन)	२५ गुण
अथवा			
गद्यमाला		(संपादक डॉ. मा. गो. देशमुख)	
२ संक्षिप्त धावता धोटा		(श्री. भा. वि. वरेरकर)	२५ गुण
किंवा			
१८५७ चा सेनानी		(श्री. व. शा. वरखेडकर)	
३ भाऊबंदकी	(नाटक)	(श्री. कृ. प्र खाडीलकर)	२५ गुण
४ कोणत्याहि सर्वसामान्य विषयावरील निबंध			२५ गुण

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रश्न पत्र २ पद्य — १०० गुण

१ नलदमयंती स्वयंवराख्यान (संपादक श्री. ना. बनहट्टी) ४० गुण
किंवा
श्लोक केकावलि (मोरोपंत)

२ रसधारा (संपादक म. श्री. पंडित) ४० गुण

३ वृत्तालंकार व्याकरण इत्यादि २० गुण

वृत्त--इंद्रवज्रा, उपेंद्रवज्रा द्रुतविलंबित, पृथ्वी, मालिनी, वसंततिलका, शिखरिणी, शार्दूलविक्रीडित, मंदाक्रांता, भुजंगप्रयात, ओवी, अभंग, मुक्तछंद, आर्या (गीति), दिंडी, साकी, पादाकुलक.

अलंकार-शब्दालंकार-यमक, अनुप्रास, श्लेष. अर्थालंकार-उपमा, दृष्टांत, अर्थांतरन्यास. रूपक, उत्प्रेक्षा, व्यतिरेक, सार, अनन्वय, अपह्नुति, भ्रांतिमान, ससंदेह, व्याजस्तुति, व्याजोक्ति स्वभावोक्ति, अतिशयोक्ति, दीपक, तुल्ययोगिता.

व्याकरण-- संधि, समास, प्रयोग.

सहाय्यक पुस्तके- व्याकरण प्रवेशिका (भावे-कुळकर्णी) वृत्तालंकार-दीपका- निजसुरे

काव्याची भूषणे-- म. वा. धोंड; भाषाप्रदीप- आ. बा. माटे

५ साहित्य स्नातक [बी. अे. समकक्ष]

परीक्षा शुल्क १० रु. — १०० गुण

प्रश्नपत्र १ गद्य

१. शिवछत्रपतीचे चरित्र (सभासदाची बखर) सं. वि. स. वाकसकर १८ गुण

२. विष्णु कृष्ण चिपळूणकर-- ग. त्र्यं. माडखोलकर १८ गुण

३. स्मृतिचित्रे भाग १- लक्ष्मीबाई टिळक १८ गुण

४. वज्राघात- ह. ना. आपटे १८ गुण
किंवा
पाणकळा- र. वा. दिघे

५. सवाई माधवरावाचा मृत्यु- कृ. प्र. खाडीलकर १८ गुण
किंवा
एकच प्याला- रा. ग. गडकरी

सहाय्यक-प्रतिमा साधन- ना. सी. फडके १० गुण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रश्नपत्र २ पद्य

१. ज्ञानेश्वरी (राजवाडे प्रत) अ. ४ था.
२. कृष्णविजय– मोरोपंत
(अ. ८०, ८१, ८३, ८६ व ८८) किंवा
विराटपर्व– मुक्तेश्वर
३. सावरकरांची कविता– संपादक वा. गो. मायदेव
४. शशिमोहन– या. मु. पाठक.

सहाय्यक ग्रंथ–अलंकार प्रदीप– डॉ. ग. त्र्यं. देशपांडे

(काव्याच्या प्रत्येक पुस्तकावर १५, स्पष्टीकरणासाठी २०, आणि व्युत्पत्ति वृत्ते व अलंकार व्याकरणादिकांवर १५ गुण राहतील.)

प्रश्नपत्र ३ भाषा–संस्कृति–वाङ्मयेतिहास. १०० गुण

१. संस्कृतिसंगम– द. के. केळकर.
२. मराठी भाषा उद्गम आणि विकास. कृ. पां. कुळकर्णी (आ २ री)
(प्रकरण १ ले पृष्ठे १ ते ७०)
३. महाराष्ट्र सारस्वत (४ थी आवृत्ति) वि. ल. भावे.
(पृष्ठे १ ते ४०३)

प्रश्नपत्र ४ काव्यशास्त्र व निबंध. १०० गुण

१. काव्यालोचन	–	द. के. केळकर	६० गुण
२. विचारसौंदर्य	–	वा. म. जोशी	
३. वाङ्मयविमर्श	–	प्रा. श्री. ना. बनहट्टी	
किंवा–			
वाङ्मयातील वादस्थळें	–	प्रा. वा. ल. कुळकर्णी	
निबंध—			
(कोणत्याहि वाङ्मयीन विषयावर)			४० गुण

६ साहित्य पारंगत [अेम. अे. समकक्ष]

भाग १ व भाग २ साठी प्रत्येकी चार प्रश्नपत्रिका राहतील. प्रत्येक पत्रिका १०० पूर्ण गुण असलेली राहील. प्रत्येक विभागाचे शुल्क १५ रुपये.

भाग १ ला:–

प्रश्नपत्रिका १ गद्य. २. विशेष वाङ्मयप्रकार : आख्यानिक कविता ३. विशेष ग्रंथकार श्री. हरिभाऊ आपटे. ४ साहित्यशास्त्र

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाग २ रा. :–

प्रश्नपत्रिका १ प्राचीन पद्य. २ अर्वाचीन पद्य. ३. भाषाशास्त्र–व्याकरणशास्त्र आणि वाङ्मयेतिहास ४ निबंध

भाग १ ला.

प्रश्नपत्र गद्य:– १०० गुण

१. लीळाचरित्र एकांक – संपादक. ह. ना. नेने
श्रीगोविंदप्रभु चरित्र – ,, डॉ. वि. भि. कोलते
२. आज्ञापत्र – रामचंद्रपंत अमात्य
३. दादोबा पांडुरंग यांचे आत्मचरित्र – संपादक अ. का. प्रियोळकर
किंवा
माझा प्रवास अथवा सन १८५७ सालच्या बंडाची हकीगत ले. विष्णुभट गोडसे, वरसईकर.
४. आमच्या देशाची स्थिति – विष्णुशास्त्री चिपळूणकर
किंवा
चिपळूणकर दर्शन. — संपादक डॉ. अ, ना. देशपांडे
५. संपूर्ण आगरकर भाग १ – सं. आळतेकर
६. साहित्य बत्तिशी (सुदाम्याचे पोहे) श्री. कृ. कोल्हटकर
७. विचार सौंदर्य – वा. म. जोशी
८. स्मृतिचित्रे भाग १ ला – लक्ष्मीबाई टिळक

प्रश्नपत्रिका २ : विशेष वाङ्मयप्रकार. १०० गुण

आख्यानक कविता

१. भास्करभट्ट बोरीकर.	शिशुपाळवध
नरेंद्र	रुक्मिणीहरण
२. एकनाथ	रुक्मिणी स्वयंवर
३. मुक्तेश्वर	शकुंतलाख्यान (आदिपर्व)
४. सामराज	रुक्मिणीहरण
५. रघुनाथपंडित :	नलदमयंती स्वयंवराख्यान (नवनीतातील)
६. मोरोपंत :	शकुंतलाख्यान (आदिपर्व महाभारत)
७. म. मो. कुंटे :	राजा शिवाजी
८. माधव ज्यूलियन :	सुधारक
९. यशवंत	जयमंगला
किंवा	
या. मु. पाठक	शशिमोहन.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रश्नपत्रिका ३ : विशेष ग्रंथकार (श्री. हरिभाऊ आपटे) १००

१. उषः काल
२. चंद्रगुप्त
३. गड आला पण सिंह गेला
४. वज्राघात
५. पण लक्षात कोण घेतो ?
६. यशवंतराव खरे
७. मी
८. स्फुटगोष्टी भाग १ व २
९. विदग्धवाङ्मय
१०. मराठी वाङ्मयाचा अभ्यास,

संदर्भग्रंथ—डॉ. भिगारे : हरिभाऊ. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे : मराठी कादंबरीचे पहिले शतक

प्रश्नपत्रिका ४ साहित्यशास्त्र १०० गुण

१. काव्यालोचन	:	प्रा. द. के. केळकर
२. भारतीय साहित्य शास्त्र (पूर्वार्ध)		डॉ. ग. त्र्य. देशपांडे
३. मराठीचे साहित्यशास्त्र (उत्तरार्ध)		डॉ. मा. गो. देशमुख
४. सौंदर्य आणि साहित्य		बा. सी. मर्ढेकर
५. Introductian to the study of Leterature		-By Hudson

भाग २ रा

प्रश्नप्रत्रिका १ प्राचीन पद्य १०० गुण

१. मुकुंदराज विवेक सिंधू	–	पूर्वार्ध अ. १ते७. (सं.कृ. पां. कुळकर्णी)
२. ज्ञानेश्वरी (राजवाडेप्रत)	–	अ. २,३,४.
३. वत्साहरण	–	(स. वि. भि. कोलते)
४. एकनाथी भागवत	–	अ. ७, ८, ९.
५. मुक्तेश्वर	–	सभापर्व
६. तुकाराम वचनामृत	–	संपादक रा. द. रानडे
७. रामदास	–	दासबोध दशक. ११ ते १५
८. मोरोपंत		सभापर्व

सहाय्यक ग्रंथ- (१) पाच संत कवि- डॉ. शं. गो. तुळपुळे
(२) प्राचीन मराठी कविपंचक- द. सी. पंगु

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रश्नपत्रिका २ — **अर्वाचीन पद्य** — **गुण १००**

१ पद्यरत्नावलि — कृष्णशास्त्री चिपळूणकर
२ केशवसुतांची कविता
३ टिळकांची कविता — ना. वा. टिळक
४ वाग्वैजयंती — गोविंदाग्रज
५ फुलांची ओंजळ — Bee
६ समग्र कविता — भा. रा. तांबे
७ पेर्तेव्हा — अनिल
८ आणखी काही कविता— बा. सी. मर्ढेकर

सहाय्यक ग्रंथ- (१) आधुनिक मराठी कविता– प्रा. म. श्री पंडित
(२) अर्वाचीन मराठी काव्य– प्रा. रा. श्री जोग

प्रश्नपत्रिका ३ (अ) भाषाशास्त्र (आ) व्याकरणशास्त्र (इ) वाङ्मयेतिहास
१०० गुण

१ मराठी भाषा उद्गम आणि विकास (आ. २ री) प्रा. कृ. पां. कुळकर्णी
२ Wilson Philological Lectures- डॉ. भांडारकर
३ व्याकरण विषयक निबंध– कृष्णशास्त्री चिपळूणकर
४ महाराष्ट्र सारस्वत (४ थी आवृत्ति) वि. ल. भावे
५ मराठी गद्याचा इंग्रजी अवतार– द. वा. पोतदार
६ आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १ व २ डॉ अ. ना. देशपांडे

प्रश्नपत्रिका ४ **निबंध**— (वाङ्मयीन विषयावर) १०० गुण

सूचना:— विदर्भ साहित्य संघाने व नागपूर विद्यापीठाने मान्य केलेल्या मराठी शुद्धलेखनाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांनी शुद्धलेखन ठेवावे अशी अपेक्षा आहे.

★ ★ ★

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाची प्रकाशने

पुस्तके	रु. पैसे
★ १ निबंध परिमल	२–२५
२ सुमन संचय	१–२५
+ ३ मराठी गद्य	१–५०
+ ४ अंमलदार (नाटक) पु. ल. देशपांडे	२–००
५ भारती (नाटक) नाना जोग	१–५०
६ हिंदी मराठी भाषा प्रवेशिका–मालतीबाई श्रीखंडे	०–७५
७ कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह भाग २	३–००
८ The Vedasthana or The Ancient F[illegible]ne of the Indo-Aryans-(पूर्ण ग्रंथ) ले. कै. तु. ज. केदार	३–००
९ ,, ,, (केवळ भाग ४)	१–५०
१० डॉ. केदार यांचे चरित्र —ले. ज. रा. जोशी	५–००
११ नाटचमहोत्सव विशेषांक	३–००

कै. गडकरी वाङमयावरील प्रबंध

१२ वाग्वैजयंतीचे पुनर्मूल्यन —डॉ. मा. गो. देशमुख	०–३१
१३ नाटककार गडकरी —द. रा. गोमकाळे	०–३१
१४ गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार—कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०–५०
१५ गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगत —प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०–५०
१६ सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल —द. वि. तेंडूलकर	०–५०
१७ गडकऱ्यांची खरी भूमिका —प्रा. भ. श्री. पंडित	०–५०
१८ गडकऱ्यांची नाटचशैली —प्रा. रू. पा. पांजणकर	०–५०

१९ "युगवाणी" मासिक —वार्षिक वर्गणी रु. ५ (वि. सा. संघाचे मुखपत्र)

पुस्तकाचे विक्रीचे अधिकार नागपूर प्रकाशन, नागपूर यांचेकडे आहेत.

पुस्तकांचे विक्रीचे अधिकार ठाकूर आणि कंपनी, नागपूर यांचेकडे आहेत.

बाकीची सर्व पुस्तके वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १ या पत्त्यावर मिळतील

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

नवीन सभासद होऊ इच्छिणारास सूचना

विदर्भ साहित्य संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल १९६० पासून सुरू झाले असून नवीन वर्षाकरिता सभासद नोंदणी सुरू झाली आहे. वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठीभाषीप्रेमी व्यक्तीला सभासद होता येते. नव्याने सभासद होणारांना आवेदनपत्र भरून द्यावे लागते. साधारण सभासदाची वार्षिक वर्गणी फक्त रु. ३ आहे. सभासदांना युगवाणीचे अंक विनामूल्य पाठविण्यात येतात सभासदांचे वर्ग पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) **उपकर्ते**—पाच हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(आ) **आश्रयदाते**--एक हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(इ) **सहाय्यक**--पाचशे किंवा अधिक रुपये देणारे.

(ई) **हितचिंतक**--अडीचशे किंवा अधिक रुपये देणारे.

(उ) **आजीव सभासद**--पन्नास किंवा अधिक रुपये देणारे.

(ऊ) **साधारण सभासद**--वार्षिक तीन रुपये देणारे.

मराठी भाषेबद्दल प्रेम असणाऱ्या जास्तीत जास्त व्यक्तींनी सभासद व्हावे. आवेदनपत्र व वर्गणी केंद्रीय कार्यालयाकडे किंवा अधिकृत कार्यकर्त्याकडे जमा करावी व पावती घ्यावी ही विनंती.

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर

हे मासिक श्री. **पुरुषोत्तम दिवाकर ढवळे**, यांनी वि. सा. संघाकरिता प्रदीप मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ